पुणे, किशोर– वर्ष ५४, अंक ७ वा, जुलै २०२५, (मासिक)– किंमत रु. ७/– पृष्ठे– ५२
Pune, Kishor- Vol. 54, Issue- 7, July 2025 (Monthly)- Price Rs. 7/- Pages- 52

# किशोर

जुलै २०२५



# पाऊसवाट

■ दासू वैद्य

बघ उन्हाचे पांग फिटले
आभाळातून थेंब सुटले

मातीचीही हौस झाली
हवाहवासा गंध ल्याली

वारा वाहे सैरभैर
ओले झाले त्याचे घर

नदी बघ जागी झाली
तलावाशी खबर गेली

ओहळाची पळपळ
नाले वाहती खळखळ

विहिरी झाल्या काठोकाठ
हिरवी झाली पाऊसवाट

झाड भिजले पानोपानी
थेंब वाजे कानोकानी

बरसे पाऊस नित्य नवा
मनामध्ये वाजे पावा

संपर्क : ९४०३५८४१११

**किशोर** जुलै २०२५, वर्ष ५४ वे, अंक ७ वा, आषाढ–श्रावण शके १९४७

- संपादक :
  कृष्णकुमार पाटील, संचालक,
  महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
  अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
- प्रकाशक :
  हेमंत बाबर
  प्र. नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक
  निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई
- निर्मिती अधिकारी : मनिष निघोट
- अक्षरजुळणी : किशोर विभाग
- कार्यकारी संपादक :
  किरण केंद्रे
- वितरण व्यवस्थापक
  जी. आर. पानसरे
- मुखपृष्ठ : अन्वर हुसेन
  संपर्क : ९१५६०९५५६०
- चित्रांकन : घनश्याम देशमुख,
  रेश्मा बर्वे, राजेंद्र गिरधारी, धनश्री केळकर,
  अजय विभुते, लोकेश कुलकर्णी, विनोद गायकवाड,
  राहुल पोतदार, माईंडईट संवाद

# अंतरंग


- पाऊसवाट ........ *दासू वैद्य* ........ ०२
- गोष्ट बिरदेवची ........ *संजय वारके* ........ ०६
- टुन्नूनं पेरलं बी ........ *वर्षा गजेंद्रगडकर* ........ ०९
- २२ जुलै पाय (∏) दिवस ........ *शशिकांत काळे* ........ १०
- जुन्या दीपगृहाकडे ........ *सुहास बारटक्के* ........ १२
- दरी बाई दरी ........ *आश्लेषा महाजन* ........ १५
- लहान कल्पना, मोठं स्वप्न, मोठं यश! ........ *नितीन पोतदार* ........ १६
- चला चित्र रंगवूया ........ *रेश्मा बर्वे* ........ १९
- न्यायसंस्थेत AI ........ *अच्युत गोडबोले* ........ २०

**अभिजात मराठी विभाग**
- पाऊस शब्दांचा : नादातील बरसातीचा ! ........ *प्रवीण दवणे* ........ २२
- रांगेत चालायचं ........ *डॉ. नीलिमा गुंडी* ........ २४
- गंमत शब्दांची ........ *प्रा. विश्वास वसेकर* ........ २६
- प्रश्नमंजुषा ........ *उदय कदम* ........ २७

- मचक पचक ........ *मनोहर भोसले* ........ २८
- अरे श्रावणा श्रावणा ........ *शिवाजी विखे* ........ ३१
- आठवणीतला बोराटाखेडा ........ *रोहिणी चव्हाण* ........ ३२
- शहरापासून दूर ........ *गणेश भाकरे* ........ ३५
- आर्वी आणि खारुताई ........ *राहुल संखे* ........ ३६
- कुतूहल. ........ *वसुंधरा भोपळे* ........ ३८

**बालविभाग**
- भावी आधारस्तंभ ........ ४०
- उमलती प्रतिभा ........ ४२
- चित्रकथा : जादूगाराची सुटका ........ *घनश्याम देशमुख* ........ ४४
- पावसात आपण नाचू या ........ *प्रशांत वाघ* ........ ४६

**ENGLISH SECTION**
- I Wish To Become ........ ***Pranjali Barve*** ........ ४७
- Raya and the value of a drop ........ ***Atul Shirude*** ........ ४८
- Funny Puzzle ........ ***Ghanshyam Deshmukh*** ........ ५०


ऑनलाईन वर्गणीकरिता : www.kishor.ebalbharati.in

वार्षिक वर्गणीची रक्कम रु.८०/– मनीऑर्डर अथवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या पुणे शाखेवरील (डिमांड ड्राफ्टद्वारे संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, या नावाने खाली नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावी. धनादेश स्वीकारला जाणार नाही.

**पत्रव्यवहाराचा पत्ता: कार्यकारी संपादक, किशोर, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,**
सेनापती बापट मार्ग, पुणे– ४११००४, **संपादकीय** : ०२०– २५७१६१०७, **वितरण व तक्रार** : ०२०–२५७१६२४४,
ई–मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in

प्रिय किशोर

मा. संपादक सो,

नमस्कार,

गेले तीन वर्षे माझ्या घरी 'किशोर' मासिक येत आहे. हे मासिक सुरू करण्यामागचा एक उद्देश असा आहे की, आमच्या घरातील प्रत्येकाने हे बालमासिक वाचावे. 'वाचाल तर वाचाल' या उक्तीप्रमाणे आमच्या घरातील आबालवृद्ध दर महिन्याला 'किशोर' मासिकाची आतुरतेने वाट पाहत असतात. आमच्या घरी येणारे अतिथी व त्यांची मुले आवडीने ते वाचतात. आजच्या मोबाईलच्या युगात लहान मुलांना 'किशोर' मासिकाची एवढी गोडी लागली आहे की मोबाईलच काय, दूरदर्शनवरील मालिका पाहायची गोडी कमी आहे.

आपल्या अंकातील मुखपृष्ठापासून ते मलपृष्ठापर्यंतचे सर्वच लेख, कथा, कविता आणि चित्रे वाचनीय असून त्यातून सर्वांना प्रेरणा मिळत आहे. 'किशोर' मासिकाला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा...

**श्री. संजय गवळी,**

बांबवडे, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर- ४१६२१३

'किशोर' हे मासिक खूप सुंदर आहे. मी व माझ्या वर्गातील मित्रमैत्रिणी आम्ही हे मासिक वाचतो. आमच्या वर्गात खूप पुस्तके आहेत. आम्हांला जेव्हा वाटेल तेव्हा आम्ही ती पुस्तके वाचतो. किशोर मासिकातील निवतीचा खडक, गोल्डन रॉक्स, म्हाताऱ्याची चूळ असे तीन भाग आम्ही वाचले. त्याच भागात नील आणि बाबूल यांचा उल्लेख आला आहे. मला नील आणि बाबूल यांची घट्ट मैत्री खूप आवडली. म्हाताऱ्याची चूळ हा भाग मला खूप आवडला. गोल्डन रॉक्स हे दृश्य आम्ही पहिल्यांदाच बघितले. किशोर मासिकात चित्रकोडी देखील असतात. ती आम्ही सोडवण्याचा प्रयत्न करतो. किशोर मासिकात थोर पुरुषांच्या गोष्टी, कविता दिलेल्या असतात आणि भावी आधारस्तंभ म्हणजे लहान मुलांनी जसं की, कोणाला मदत केलेली असते; तर ती किशोरमध्ये छापून येते. उमलती प्रतिभा म्हणजे लहान मुलांनी लिहिलेल्या कविता किंवा चित्रे त्यामध्ये छापून येतात. यात इंग्रजीमधून कविता गोष्टी लिहिलेल्या असतात. नंतर त्यात सामान्य ज्ञानावर आलेले प्रश्न म्हणजे कुतूहल होय. आम्हांला 'किशोर' मासिकातील हे सर्व लेखन खूप आवडते. ते मनापासून वाचल्यावर आम्ही समजून घेतो. 'किशोर' कायम माझ्या आठवणीत राहील.

**कु. वीणा रोहित भोईटे**

जि.प.केंद्रशाळा, निंबळक, ता. फलटण, जि. सातारा- ४१५५२३

हितगुज

# एडिसनची गोष्ट..




किशोर मित्रमैत्रिणींनो, तुमची शाळा नुकतीच सुरू होऊन काही दिवस झाले आहेत. नवा वर्ग, पुस्तके, मित्रमैत्रिणी, शिक्षक यांच्या आणि पावसाच्या साथीने तुमचे नवीन, हिरवेगार, प्रसन्न असे शैक्षणिक वर्ष सुरू झाले आहे. वातावरणात सर्वत्र उत्साह आणि तजेला आहे. शाळेच्या पाऊलवाटेवर ऊन-पावसाच्या पाठशिवणीचा आणि गवतफुलांभोवती बागडणाऱ्या फुलपाखरांचा खेळ तुम्हांला अनुभवायला मिळतो आहे. एकूणच हे वातावरण खूप सकारात्मक, आनंददायी ऊर्जा आणि टवटवीतपणा यांनी भारलेले आहे. निसर्ग जणू जोमाने आनंदाची शिंपण करत आहे. या काळाचा, ऋतूचा, त्यातील विविध क्षणांचा आनंद घेण्याची आणि त्यातील आनंददायी ऊर्जेच्या साथीने अभ्यास, खेळ, कला, छंद यांची मनःपूर्वक जोपासना करण्यास तुम्हांला खूप उत्तम संधी लाभलेली आहे. त्यामुळे तुम्ही ही सुवर्णसंधी सोडू नका. यानिमित्ताने प्रसिद्ध संशोधक थॉमस अल्वा एडिसन यांच्या शालेय जीवनातील एक घटना तुम्हांला सांगावीशी वाटते..

थॉमस अल्वा एडिसन हे नाव आपणापैकी अनेकांना ठाऊक असेल. थोर अमेरिकन संशोधक म्हणून त्यांना ओळखले जाते. एडिसन यांनी अनेक महत्त्वाचे शोध लावले. अनेक वस्तूंची निर्मिती केली. विजेचा दिवा हा त्यांचा प्रमुख शोध. त्यांनी बल्बचा शोध लावला ही त्याची ठळक ओळख झाली. याच थोर संशोधक एडिसन यांची बालपणी त्याच्या शाळेतून हकालपट्टी करण्यात आली होती हे तुम्हांला ठाऊक आहे का? थॉमस एडिसन यांना बालपणी अतिशय कमी ऐकू यायचे. पुढे त्यांना एका कानाने ऐकू येईनासे झाले. त्यात ते अधूनमधून आजारी पडायचे त्यामुळे शाळेत त्यांची उपस्थिती खूपच कमी होती. व्यवस्थित ऐकू येत नसल्यामुळे त्यांना वर्गात बसायला, मित्र बनवायला खूप अडचणी आल्या. त्यामुळे ते एकलकोंडे झाले. खरेतर ते खूप हुशार आणि उत्साही होते. त्यांच्या शिक्षकांनी त्यांना 'हा वेडा मुलगा अजिबात शाळेत ठेवण्यायोग्य नाही' असे वर्गात सर्वांसमोर म्हटले. शिक्षकांच्या अशा बोलण्याने त्यांना खूप दुःख झाले आणि ते रडत घरी गेले. घरी गेल्यावर त्यांनी आपल्या आईला याबद्दल सांगितले. त्यांची आई खूप समजूतदार होती. ती त्यांना घेऊन पुन्हा शाळेत आली. आईने त्या शिक्षकांना सांगितले की, ''एडिसन खूप हुशार आणि उत्साही मुलगा आहे.'' पुढे त्यांच्या आईने स्वतः एडिसनला वाचायला, लिहायला शिकवले. त्याच वेळी एडिसन यांनी मनोमन ठरवले की ते आईच्या विश्वासाला सदैव पात्र ठरतील आणि आईचा दुर्दम्य विश्वास सार्थ करून दाखवतील. त्यासाठी खूप मेहनत, कष्ट करतील. या प्रसंगातूनच एका महान संशोधकाचा जन्म झाला.

याच एडिसनने अनेक शोध लावले. अनेक वस्तूंची निर्मिती केली. विजेच्या दिव्याचा (बल्बचा) प्रयोग करताना त्यांना एक दोन नव्हे तर, तब्बल १० हजार वेळा अपयश आले होते. पण ते खचले नाहीत. प्रयत्न करत राहिले आणि बल्बचा शोध लावलाच. त्या वेळी एका मुलाखतीत त्यांना ''१० हजार वेळा प्रयोग करून तो असफल ठरल्यावर निराश झाला नाही का?'' असा प्रश्न विचारण्यात आला तेव्हा ते म्हणाले की, ''मी निराश का होऊ? मी कधीच असफल झालोच नव्हतो, उलट मी बल्ब तयार करण्याच्या १० हजार चुकीच्या पद्धतींचा शोध घेतला होता.'' मित्रांनो तुम्हीदेखील एडिसन सारखी सकारात्मकता आणि इच्छाशक्ती अंगी बाळगा आणि हे सुंदर जग अधिक सुंदर करा.

**किरण केंद्रे**
कार्यकारी संपादक

संजय वारके



# गोष्ट बिरदेवची

मित्रांनो, २२ एप्रिल २०२५ रोजी दुपारी 'मेंढ्या राखणारा मुलगा आय.पी.एस. झाला.' 'मेंढपाळाचा मुलगा आय.पी.एस. झाला.' ही बातमी आपल्या मोबाईलवर धडकली. तोच मी बिरदेव डोणे. मेंढपाळाचा मुलगा आय.पी.एस होणं ठीक आहे. यात काही गैर नाही, पण दिवसभर मेंढ्यांच्या मागं फिरून आय.पी.एस. होता येईल का? हे शक्य आहे का? हेच मी तुम्हांला सांगणार आहे.

बालमित्रांनो, मी बिरदेव सिद्धाप्पा डोणे, गाव यमगे, ता. कागल, जि. कोल्हापूर हे माझं गाव. गावातीलच जिल्हापरिषदेच्या प्राथमिक शाळेत मी शिकलो. लहानपणी मी खूप खेळायचो. बालपणाचा आनंद मी चांगला उपभोगला आहे.

मी पाचवीत गेल्यावर खऱ्या अर्थाने अभ्यासाला सुरुवात केली. शाळेने माझ्यासह अनेक विद्यार्थ्यांना नवोदय परीक्षेला बसवले. त्या वेळी शाळेतच नवोदय परीक्षेची तयारी करून घ्यायचे. घरी आई वडील शेतात मजुरीला जायचे. ते आपल्या आपल्या कामात. कुटुंबाचा उदरनिर्वाह हाच त्यांच्यासमोरचा मोठा प्रश्न. त्यांनी अभ्यासाबद्दल कधीच सक्ती केली नाही.

माझ्या मर्जीप्रमाणे अभ्यास चालू होता. परीक्षा दिली म्हणजे नवोदयला निवड होईल असे मला वाटत होते. माझाच वर्गात पहिला नंबर यायचा त्यामुळे नवोदयला निवड होईल अशी आशा होती. नवोदयच्या निकालाने माझी थोडी निराशा झाली. माझ्या जीवनातलं हे पहिलं अपयश.

'अपयश ही यशाची पहिली पायरी असते.' मी ठरवलं; आता अभ्यासाशिवाय पर्याय नाही. मी खूप मन लावून अभ्यास करायला सुरुवात केली. मला लहानपणापासून एक सवय आहे. मी एकदा खेळायला लागलो तर, तहान-भूक विसरतो. मनसोक्त खेळतो, पण एकदा का अभ्यास करायला लागलो तर स्वतःलाही विसरतो. मन एकाग्र करून प्रत्येक काम करायचं ही माझी सवय. माझी ही अभ्यासाची पद्धत बघून आमच्या वर्गशिक्षिका शीला जाधव बाई म्हणायच्या, ''बरू, तू एक दिवस आमच्या वरचा मोठा अधिकारी होशील.''

मी म्हणालो,

''बाई, अधिकारी शिक्षकांपेक्षा मोठे असतात?''

''हो, अधिकारी हे मोठं पद आहे. शिक्षण पूर्ण झाल्यावर स्पर्धा परीक्षा दिली की अधिकारी होता येतं.''

''स्पर्धा परीक्षेसाठी खूप अभ्यास करावा लागतो का हो?''

''अभ्यास करावाच लागतो; पण तो परीक्षेपुरता नाहीतर. अभ्यास ज्ञान मिळवण्यासाठी करायचा असतो.''

''अभ्यासानं अधिकारी होता येतं?''

''का नाही? जरूर होता येतं.''

''असाध्य ते साध्य करिता सायास, कारण अभ्यास तुका म्हणे.''

अभ्यासाने प्रत्येक गोष्ट साध्य करता येते. अधिकारी होण्याचे हे स्वप्न माझ्या प्राथमिक शाळेतील बाईंनी माझ्यामध्ये पेरले. शाळेत शिक्षक जेवढा अभ्यास सांगतील तेवढा अभ्यास वेळच्या वेळी मी पूर्ण करत होतो. अभ्यास केला नाही असा एकही दिवस नाही. याचं फळही लगेच मला मिळालं. जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेत मी भाग घेतला. बक्षीस म्हणून मला सायकल मिळाली. मला खूप आनंद झाला. त्या वेळी नवीन सायकल घेण्याची आमची ऐपत नव्हती. मी अभ्यास करून सायकल मिळवली होती. त्या वेळी बाई म्हणाल्या, ''बिरदेव, आज सायकल मिळवलीस. असाच अभ्यास केलास तर उद्या लाल दिव्याची गाडीही मिळेल.'' माझ्यातलं स्वप्न जिवंत ठेवण्याचं काम जाधव बाईंनी केलं.

मी आठवीला गावातील हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. शाळा सुरू झाली. नंतर समजले की, आठवीला 'राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकांमधील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा' (NMMS) असते. या परीक्षेत पात्र ठरल्यास वर्षाला सहा हजार रुपये अशी चार वर्षे शिष्यवृत्ती मिळते. घरची परिस्थिती गरिबीची. आपण शिष्यवृत्तीचे पैसे मिळवू शकतो. असा विचार करून मी अभ्यासाला सुरुवात केली. दररोज नियमित अभ्यास, प्रश्नपत्रिकांचा भरपूर सराव केला. NMMS परीक्षा पात्र ठरलो. दहावीला ९६ टक्के गुण मिळवून आणि बारावी विज्ञान शाखेत ८९ टक्के गुण मिळवून दोन्ही वेळा केंद्रात पहिला आलो. दहावीला गणित विषयात १०० पैकी १०० गुण व बारावीला १०० पैकी ९९ गुण मिळाले. मला सगळेच विषय आवडायचे तरीही गणित विषय माझा जास्त आवडता होता.

बारावीनंतर पुढे काय? असा प्रश्न होता. सामाईक प्रवेश परीक्षेत (MHT CET) चांगले गुण मिळाले. पुण्यातील 'कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे (COEP) मध्ये प्रवेश घेतला. गणित चांगलं होतं. स्थापत्य अभियांत्रिकी (Civil Engineering) शाखा निवडली. अभियंता बनण्याचं स्वप्न पूर्ण करायचं होतं. पुण्यात राहिलो. माझ्या शिक्षणाचा भार घरच्यांवर पडत होता. आईवडलांचे कष्ट बघून वाईट वाटायचे; पण पर्याय नव्हता. खेडेगावातून पुण्यात आलो होतो. रुळायला थोडा वेळ लागला. नंतर मात्र सवय होत गेली.

मी इंजिनिअरिंगच्या दुसऱ्या वर्षाला असताना COEP कॉलेजचे सोळा विद्यार्थी केंद्रीय लोकसेवा आयोगा (UPSC)च्या गुणवत्ता यादीत आले. कॉलेजमध्ये त्यांच्या सत्काराचा कार्यक्रम झाला. कार्यक्रमानंतर मी त्यांपैकी काही विद्यार्थ्यांना भेटलो. त्यांचे १० वी, १२ वीचे गुण विचारून घेतले. माझ्या १० वी, १२ वी गुणांची पडताळणी केली आणि मनात प्रश्न आला की, ते पास होऊ शकतात तर मी का नाही? त्याच वेळी केंद्रीय लोकसेवा आयोग UPSC परीक्षा द्यायचीच हा निश्चय केला.

इंजिनिअरिंग शिक्षण पूर्ण केले. कोरोना काळ होता. गावी आलो. पोस्ट खात्याची जाहिरात बघून अर्ज केला. परीक्षा दिली. नोकरी मिळाली. दहा महिने काम केले. एके दिवशी माझा मंगळवेढ्याचा मित्र जय पाटीलचा फोन आला. ''मी UPSC च्या तयारीसाठी दिल्लीला जातोय. तू सुद्धा ये.'' ''मित्रा, मला शक्य होणार नाही. दिल्लीतील क्लासची फी, राहणं, तिथलां खर्च मला परवडणार नाही. पैशाचा प्रश्न आहे.'' ''अरे, तू हुशार आहेस. तू तयारी केली पाहिजेस. पहिलं गाव सोड.''

''तुझं बरोबर आहे मित्रा, सगळी सोंगं करता येतात, पण पैशांचं सोंग करता येत नाही.''

''मित्रा, पैशांची सोय आम्ही करतो. तू दिल्लीला ये.'' मित्राच्या आजोबांनी पुण्यातील एका ट्रस्टच्या मदतीने क्लासची फी भरली. मी दिल्लीला गेलो. दिड वर्षे दिल्लीमध्ये अभ्यास केला. दिल्लीतील हवामान मानवेना आणि पैशाचा प्रश्नही होताच म्हणून परत पुण्यात आलो. पुणे ज्ञानप्रबोधिनीमध्ये प्रवेश घेतला. जिद्दीनं अभ्यासाला सुरुवात केली. इथंही पैशांचा प्रश्न होताच. भाऊ थोडेफार पैसे पाठवाचा; पण त्यालाही मर्यादा होत्या. आर्थिक परिस्थितीचा बाऊ न करता अभ्यास करत राहिलो. समाजातील अनेक घटकांनी मदत केली. आपले प्रयत्न प्रामाणिक असतील तर समाज भरभरून मदत करतो याचा अनुभव मला आला आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोगाची UPSC ची दोन वेळा परीक्षा दिली. दोन्ही वेळा थोडक्यात अपयश आलं. प्रत्येक वेळी काय चुकतं याचा शोध घेऊन योग्य बदल केले आणि तिसऱ्या प्रयत्नात यशाला गवसणी घातली. आत्मविश्वासानं मुलाखत दिली. यश मिळवणारच याची खात्री पटली. ठाम विश्वास वाटला.

परीक्षा झाल्यावर पुण्यात राहून खर्च वाढवण्यापेक्षा गाव गाठलं. वडील आजारी होते. थोडा हवाबदल व्हावा, त्यांना बरं वाटावं म्हणून त्यांना घेऊन मामांच्या बकऱ्यात गेलो. बेळगाव परिसरात मेंढ्या राखतानाच २२ एप्रिल २०२५ रोजी दुपारी मित्राचा फोन आला. तो म्हणाला, ''अभिनंदन! बिरदेव ५५१ वा रँक आहे.'' दोन मिनिटं काहीच सुचलं नाही. आमच्या बाईंचे शब्द आठवले.

''बिरू, तू एक दिवस आमच्या वरचा मोठा अधिकारी होशील.'' डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. मन भरून आलं. निकाल लागला त्या दिवशी भर उन्हात मी मेंढरांसोबत होतो म्हणून बातमी पसरली. 'मेंढपाळाचा मुलगा आय.पी.एस. झाला.' 'मेंढ्या राखणारा मुलगा आय.पी.एस. झाला.' त्याच दिवशी फोन करून ती बाईंना सांगितलं.

''बाई, तुमचे शब्द मी खरे करून दाखवले.''

मित्रांनो, मी परीक्षा, मुलाखत या सर्व बाबी पूर्ण करून मोकळ्या वेळात मेंढरं राखायला गेलो. दिवसभर मेंढरांच्या मागं राहून स्पर्धा परीक्षा पार करता येत नाही. त्यासाठी अभ्यासच करावा लागतो. मी प्राथमिक शाळेपासून अभ्यास केलाय. शिवाय शेवटची चार वर्षे मी स्वतःला अभ्यासात गाडून घेतलं होतं. बी स्वतःला जमिनीत गाडून घेते तेव्हाच ती उगवते. माणसाला यश दिसतं., पण त्यामागचे कष्ट दिसत नाहीत. कष्टाशिवाय फळ नाही आणि मेहनतीशिवाय यश नाही. मित्रांनो, माझं तुम्हांला सांगणं आहे. 'गुरुजनांचे, आईवडलांचे ऐका. चांगल्या मित्रांची संगत करा. मोबाईलपासून दूर रहा. वेळेचे नियोजन करून मन लावून अभ्यास करा म्हणजे यश तुमचेच आहे.'

**संपर्क : ९४२११२०५१२२**

# टुन्नूनं पेरलं बी


■ वर्षा गजेंद्रगडकर

दप्तर घेऊन, गाणी गात टुन्नू निघाला शाळेत,
लाल चोचीचा, पोपटी-हिरवा पोपट भेटला वाटेत.
‘‘कुठे भटकून आलास बाबा?’’ टुन्नू म्हणाला त्याला,
‘‘नदीपल्याडच्या राईत होतो, महिना आता झाला.’’
चोच उघडली पोपटानं अन् गंमत एक झाली,
जांभळट पांढरी बी सुळकन चोचीतून पडली खाली.
बी उचलून, निरखत-बिरखत टाकली टुन्नूनं खिशात,
‘‘जाऊन येतो शाळेत,’’ म्हणाला, ‘‘बोलू पुन्हा निवांत’’.
खुशीत निघाला, शीळ घालत पोपट उडून गेला,
शाळा संपवून टुन्नू पटकन घराकडे धावला.
खिशातून काढली बी आणि उकरली अंगणात माती
ठेवली बी, मातीनं झाकली, घातलं ओंजळभर पाणी.
नेमानं पाणी घालत राहिला, कोंब बाहेर आला,
आई म्हणाली, ‘‘कुठलं रे झाड, काय येईल त्याला?’’
‘‘फळ की फूल, लहान की मोठं.. काहीच ठाऊक नाही,
पेरायच्या बिया, लावायची झाडं एवढंच मला माहिती,’’
म्हणाला टुन्नू, तेवढ्यात आला त्याचा दोस्त पोपट,
आईला म्हणे, ‘‘आता ऐका माझी थोडी वटवट.
गुणी टुन्नूनं लावलंय बरं का झकास जांभूळझाड,
वाढेल तुमच्या अंगणात आता चांगलंच ताडमाड.
मिळतील जांभळं भरपूर आणि इतर पक्षीही येतील,
त्यांच्यामुळे बिया विखुरतील, दूर दूर जातील.
उधळा बिया, उगवू द्या झाडं, वाढू द्या हो त्यांना,
तुम्ही-आम्ही मजेत राहू- दिलं वचन तुम्हांला.
टुन्नूसोबत गाईन गाणी, गोष्टीसुद्धा सांगीन,
पंखांवर त्याला बसवून हिरवं जग फिरवून आणीन.
झाड, झुडपं, वेल, गवत... सगळ्या हिरव्या खुणा
उजाड जग बदलण्यासाठी त्याच हव्यात पुन्हा.
बीज हेच मूळ त्यांचं- जपा आणि लावा,
टुन्नूसारख्या छोट्यांकडून मोठ्यांनीही शिका!
बरं का, मोठ्यांनीही शिका!’’

संपर्क : ९८२२०५६१२४



शशिकांत काळे



# २२ जुलै: पाय ($\Pi$) दिवस

भारतात २२ जुलै हा पाय ($\Pi$) दिवस म्हणून साजरा केला जातो. $\Pi$ ही भूमितीतील एक विशिष्ट संख्या आहे. $\Pi$ या संख्येची व्यावहारिक किंमत $\frac{२२}{७}$ इतकी धरली जाते. त्यामुळे जुलै म्हणजे ७व्या महिन्यातील २२ ही तारीख $\Pi$ दिवस साजरा केला जातो. भारतात २२ जुलै ही तारीख २२/०७/२०२५ अशी लिहिण्याची पद्धत आहे. ह्या उलट अमेरिकेत महिना प्रथम आणि नंतर तारीख लिहिण्याची पद्धत. उदा. ३/१४/२०२५ म्हणजे मार्च (३ ऱ्या) महिन्यातील १४ वा दिवस $\Pi$ दिवस साजरा केला जातो. आता ३–१४–२०२५ का? तर $\Pi$ ची दशमान पद्धतीतील किंमत ३.१४... (दोन दशांशापर्यंत) आहे. त्यामुळे अमेरिकेत मार्च १४ हा दिवस $\Pi$ दिन म्हणून साजरा केला जातो.

वर्तुळाच्या परिघाचे व्यासाबरोबरचे गुणोत्तर किती असेल. ह्या संबंधी कुतूहल जुन्या काळातही होते. बाबिलोनियन संस्कृतीमधे $\Pi$ चे मूल्य ३.१२५ इतके धरले जात असे. इजिप्शियन संस्कृतीमध्ये ते ३.१६०६

धरले जात होते. आर्किमेडीजने वर्तुळाच्या परिघाचे ९६ छोटे छोटे भाग केले. म्हणजे ९६ छोटे छोटे समभूज त्रिकोण तयार केले. त्या समभूज त्रिकोणाच्या पायांची बेरीज आणि वर्तुळाचा व्यास यांचे गुणोत्तर $\frac{२२३}{७१}$ ते आणि $\frac{२२}{७}$ ह्या गुणोत्तराच्या दरम्यान असल्याचे त्याने सांगितले. इ.स.१८ व्या शतकात फ्रेंच गणिती लॅम्बॉर्डने प्रथम असे जाहीर केले की, ह्या गुणोत्तराची अचूक किंमत काढणे अशक्य आहे. सन १७०८ मध्ये विलियम जोन्स याने त्या गुणोत्तराला Π हे ग्रीक भाषेतील चिन्ह बहाल केले. तरी ते सर्वमान्य होण्यासाठी मात्र १७३७ साल उजाडावे लागले. हे सर्व भारताबाहेरील संशोधकांबद्दल झाले. पण इ.स. काळापूर्वी पासूनच भारतातील अनेक गणितज्ञांनी Π ची किंमत निश्चित करण्याचे प्रयत्न केले आहेत.

'सूर्य प्रज्ञाप्ती' ह्या प्राचीन जैन ग्रंथात परीघ/व्यास यांच गुणोत्तर १० च्या वर्गमूळाइतके ($\sqrt{१०}$) मानले गेले आहे. ब्रह्मगुप्त यांनीही हे गुणोत्तर $\sqrt{१०}$ असावे असे म्हटले होते. (जुन्या काळात Π हे चिन्ह वापरात नव्हते. तरी ह्या पुढील विवेचनात सोयीसाठी Π ची किंमत असाच उल्लेख असेल) इ.स.पूर्व ८०० ते २००१ ह्या काळातील शुल्बसूत्रांत Π ची किंमत ३.००८, ३.००४ किंवा ३.०८८ अशी म्हणजे ३पेक्षा थोडी जास्त समजली गेली आहे.

आर्यभट्ट ह्या गणिताचार्याने (इ.स.५ वे शतक) Π ची किंमत चार दशांश स्थानापर्यंत अचूक दिलेली आहे. त्या काळात पाठांतराद्वारे ज्ञान संक्रमित करण्याची पद्धत असल्याने ती किंमत त्याने श्लोकबद्ध केलेली आहे. तो श्लोक असा आहे.

**चतुराधिकं शतमष्टगुणं द्वादशष्टिस्तथा सहस्त्राणम्।**
**अयुतद्वयस्य विश्कम्भस्य कमीशौ वृत्तपरिणाहः॥**

अर्थ, Π जर वर्तुळाचा व्यास २०,००० (अयुतद्वय) असेल तर त्या वर्तुळाचा परीघ अंदाजे (१००+४)x८+६२०००= ६२८८२ म्हणजे $\frac{६२८८२}{२०००००}$ = ३.१४१६ असेल. ह्यानुसार Π ची किंमत चार दशांश स्थळापर्यंत दिलेली आहे. त्यातही महत्त्वाचे म्हणजे ही किंमत 'आसन्न' म्हणजे 'जवळची' आहे 'अचूक' नाही. १८ व्या शतकात फ्रेंच गणिती एच. लँबर्ट ह्याने हेच सांगितले.

१२ व्या शतकातील प्रसिद्ध गणिती भास्कराचार्य यांनी हीच किंमत $\frac{३९२७}{१२५०}$ अशी सांगितली आहे. तो श्लोक

**व्यासे भनन्दाग्निहते विभक्ते खबाणसूर्यैः परिधिः ससूक्ष्मः ।**
**द्वाविंशतिघ्ने विहतेऽथ शैलैः स्थूलोऽथ वा स्याद्व्यवहारयोग्यः ॥ इति ।**

भास्कराचार्यांनी १२५० ही किंमत सूक्ष्म आहे व $\frac{२२}{७}$ ही किंमत स्थूल असून व्यवहारात वापरण्यास योग्य आहे. असे म्हटले आहे.

चौदाव्या-पंधराव्या शतकात केरळच्या गणिती परंपरेतील माधव, नीळकंठ ज्येष्ठदेव यांनी मोलाचे कार्य केले. तर माधवाचार्य यांनी Π चे गुणोत्तर

$$\frac{(२, ८२७, ४३३, ३८८, २३३)}{९००, ०००, ०००, ०००} = ३.१४१५९२२६५३४५९$$

इतके असल्याचे नमूद केलेले आहे.

श्रीनिवास रामानुजन यांनी तयार केलेल्या सूत्रांनुसार Π ची किंमत १३ दशांश स्थानांपर्यंत काढता येते.

**गोपी भाग्यम ध्रुवात श्रंगिशोदधिसंधिग् ।**
**खलजीवित खाताब गलहालारसंधर ॥**

कटपयादी ह्या प्रकारात प्रत्येक अक्षराला अंक दिलेला असतो. त्यानुसार वरील श्लोकातील गो=३ आणि नंतर दिलेल्या अंकानुसार Π ची किंमत ३.१४१५९२६५..... असे ३१ दशांश स्थानापर्यंत सांगितलेली आहे. दुसरी गंमत म्हणजे हा श्लोक कृष्ण आणि शंकराचे वर्णन करणारा वाटतो. पण त्यामध्ये Π ची किंमत सांगितलेली आहे.

**संपर्क : ९९७५२४४४६७**


सुहास बारटक्के

भाग ७

# जुन्या दिपगृहाकडे

त्या दिवशी नील व बाबूल भल्या पहाटे उठून समुद्राकडे निघाले. बाबांनी शिवरामकाकांना सोबत नेण्याकरता सांगितलं. शिवरामकाका मासेमारी बोटीवर काम करायचे. इंजिन असलेली होडी उत्तम चालवायचे. बाबूलच्या बाबांच्या बोटीवर ते अनेक वर्षे कामाला होते. पण ते मुके होते. त्यांना बोलता येत नसे. पण वाऱ्या वादळातही होडी सुखरूप किनाऱ्यावर आणायचे. म्हणूनच बाबूलच्या बाबांनी त्यांना सोबतीला दिले होते. पहाटेच्या वाऱ्यात तिघांनी होडी समुद्रात लोटली. बाबूलमुळे नीलसुद्धा आता समुद्राशी उत्तमरित्या परिचित झाला होता. होडी थोडी तिरकी चालवत लाटांवर स्वार होत शिवरामकाकांसह नील व बाबूल समुद्रात शिरले. आता किनाऱ्यावर धावणाऱ्या लाटांचा त्रास थोडा कमी झाला होता.


समुद्राची खोली वाढली असल्यानं होडी मात्र डचमळत होती. तिघेही होडी चालवत नवीन दीपगृहापाशी आले. एका खडकाळ बेटावर हे अत्याधुनिक दीपगृह सुरक्षित जागी उभारलं होतं. एखाद्या ताजमहालच्या चहू बाजू असणाऱ्या मिनारांप्रमाणं त्या दीपगृहाचा आकार होता. परंतु दुरून खांबाप्रमाणं भासणारं हे दीपगृह जवळ



# वेंगुर्ला रॉक्सचे रहस्य

जाताच भव्य वाटायचं. नव्या दीपगृहाला वळसा मारून त्यांची होडी आता जवळच असलेल्या जुन्या दीपगृहाकडे निघाली. हे जुनं दीपगृह अगदी पडक्या अवस्थेत होतं. त्याची कथा बाबूलच्या बाबांनी मागच्या वेळी सांगितली होती. परंतु ते पाहिलं मात्र नव्हतं. इथं पूर्वी रॉकेल किंवा डिझेलचा वापर करून दिवा प्रज्वलित केला जायचा. काचेतून त्याचा प्रकाश दूर समुद्रावर फेकला जायचा. बोटींना दिशा कळायची व निवती बंदर आलं म्हणून कळायचं. पुढे या जुन्या दीपगृहाच्या बेटावर लाटांचं आक्रमण वाढलं. इंधन घेऊन इथवर येणंही अवघड झालं. मग शेकोटी पेटवून प्रकाश निर्माण केला जायचा. त्यात एकदा ते दीपगृह आगीच्या भक्ष्यस्थानी पडलं व तेव्हापासून बंद पडलं होतं. मागच्या वेळी बाबांसोबत नवं दीपगृह पाहिलं होतं; पण दूर आत समुद्रात असलेलं हे जुनं दीपगृह मात्र पाहता आलं नव्हतं. ११० फुट उंचीच्या या दीपगृहाच्या तिन्ही बाजूंना मोठमोठे खडक होते. त्यावर लाटा आपटत होत्या. होडी खूप हेलकावे खात होती. या बेटावर उतरणं अवघड होतं परंतु शिवरामकाका मोठे कसबी होडीचालक होते. त्यांनी खुणेनंच सांगितलं की आपण पुढच्या बाजून गेलो तर आपल्याला या बेटावर उतरता येईल. त्यानुसार तिघे लाटांशी सामना करत दीपगृहाच्या बेटाच्या पुढच्या भागात आले आणि पाहतच राहिले.

'वेंगुर्ला रॉक्स' म्हणजे ज्यांना निवतीचे खडक



म्हणतात ते इतके भव्य दिव्य व सुंदर असतील अशी त्यांनी कधी कल्पनाही केली नव्हती. खूप सुंदर असे प्रचंड आकाराचे खडक आणि मधोमध पाण्याचा एक प्रवाह आत शिरला होता. मासेमारी करणाऱ्या होड्या व बोटी इकडे फिरकत नसत. खडकावर आपटून फुटण्याची भिती होतीच, शिवाय या बेटांवर भुतांचा वावर आहे असाही काही अशिक्षित मच्छिमार लोकांचा समज होता. त्यामुळे त्या सुंदर बेटावर कुणीही जात नसे. आज मुलांच्या हट्टामुळे शिवरामकाका त्यांना घेऊन इकडे आले होते. त्यांनी आपली होडी खडकाच्या खोबणीत एका सुरक्षित जागी घुसवली व एका खडकाच्या टोकाला दोर बांधून तिघेही खाली उतरले. खडकाळ भागातून चालत चालत ते वर टेकडीवर आले आणि पाहतच राहिले. समोर खडकात खूप मोठ्या भव्य अशा गुहा होत्या. गुहेच्या बाहेर जागोजागी समुद्रपक्ष्यांची घरटी पसरली होती. पाण्याशेजारी राहून पाण्यातल्या माशांची शिकार करणारे टर्न नावाचे ते समुद्रपक्षी होते. नीलचं वाचन उत्तम असल्यानं त्यानं नेमकं ते ओळखलं. अक्षरशः शेकडो टर्नपक्षी खडकांवर इकडेतिकडे बसून गुर्रगुर्र असा आवाज काढत होते. त्यांच्या माद्यांनी त्या बेटावर जागोजागी गवत व काड्या वापरून घरटी बांधली होती. सुखेनैव त्या घरट्यात अंडी उबवत बसल्या होत्या. नील व बाबूल यांनी काकांना तिथेच थांबायला सांगितलं व ते हळूहळू आवाज न करता पुढे सरकू लागले. पक्ष्यांचा कलकलाट वाढत गेला. पण दोघेही गुहेच्या दिशेनं पुढे जात राहिले. दोघेही गुहेपर्यंत पोहोचले आणि अचानक अंधारून यावं तसं गुहेतून काळ्या पाकोळ्यांची झुंडच्या झुंड बाहेर आली ''हे इंडियन स्वीफ्टलेट्स नावाचे पक्षी. यांना आपण पाकोळी म्हणतो. आज इतक्या संख्येनं हे पक्षी मी प्रथम पाहिले.'' नील म्हणाला, तसा बाबूल म्हणाला, ''हो रे, मीसुद्धा प्रथमच पाहतोय या स्वीफ्ट पक्ष्यांचे निवासस्थान.''

दोघे त्या गुहेच्या तोंडाशी गेले आणि त्यांनी गुहेच्या छताकडे पाहिलं तर पाकोळ्यांची ६०-७० घरटी त्यांना दिसली. प्रत्येक गुहेत अशीच घरटी असणार हे त्यांच्या लक्षात आलं. सर्वांत मोठ्या गुहेत ते शिरले आणि पाहतच राहिले.

गुहेच्या छतापर्यंत पोहोचण्यासाठी कुणीतरी बांबू व लाकडाच्या शिड्या तयार केल्या होत्या. म्हणजे मानवी हस्तक्षेप इथं होता. नील व बाबूलला तर आश्चर्याचा धक्काच बसला. कोण बरं येत असेल या निर्जन बेटावर? आणि का? या प्रश्नांनी त्यांना हैराण केलं. ही एका बाजूची घरटी काढलेली दिसतात. कुणी काढली असतील? आणि का? या सगळ्या प्रश्नांची त्यांना घरी गेल्याशिवाय मिळणार नव्हती. पण इथे काहीतरी रहस्य दडलंय एवढं मात्र खरं होतं. दोघं घरटी पाहण्यात गुंग झाले असतानाच दुरून शिवरामकाकांनी होडीतला डबा वाजवत त्यांना परत यायला खुणावलं. दोघेही होडीकडे परत आले आणि शिवरामकाका त्यांना घेऊन तासभरात किनाऱ्यावर परत आले.

आता नीलच्या घराकडे दोघेही धावले. तिथं नीलनं आपला पुण्यातून आणलेला छोटा संगणक काढला त्याला इंटरनेट जोडलं असल्यानं नीलनं माहिती मिळवायला सुरुवात केली.

१८६५ साली ॲलन ह्यूम नावाचे ब्रिटीश अधिकारी इथं आले होते. त्यांनी लिहून ठेवलं होतं की 'वेंगुर्ला रॉक्स' मध्ये असलेल्या गुहांमधून स्वीफ्ट पक्षी वर्षानुवर्षे रहात आहेत. त्यांची हजारो घरं तिथं आहेत. त्यानंतर तिथं बांधलेलं दीपगृह काळाच्या ओघात नष्ट झालं व मानवी हस्तक्षेप थांबला. कित्येक वर्षं इकडे कुणीच जात नव्हतं. जाणंही फार धोक्याचं होतं.'

मग नीलनं 'स्वीफ्टलेटस' म्हणजे पाकोळ्यांची माहिती वाचली. या पाकोळ्या आपल्या लाळेपासून घरटी बनवतात. पांढुरक्या रंगाची ही घरटी बऱ्याच देशांमध्ये औषधासाठी वापरतात. त्यांची उपलब्धता फारच कमी असल्याने त्याला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत खूप किंमत मिळते.

ही सगळी माहिती वाचल्यावर नील व बाबूल यांनी ठरवलं की, आता 'तिथे शिड्या कुणी बांधल्या ते शोधून काढायचं...'

**संपर्क : ९४२३२९५३२९**

# दरी बाई दरी

■ आश्लेषा महाजन



दरी बाई दरी
खोल खोल दरी
दरीमध्ये गोल गोल
फिरतेय परी...

परी बाई परी
लाल लाल परी
परीच्या पंखांची
पिसं भरजरी...

पिसे बाई पिसे
वाऱ्यावरी हसे
ऊन ऊन उन्हेरी
छान छान ठसे...

छान बाई छान
दरीमधले रान
रानामध्ये हिरवे हिरवे
पान अन् पान...

पानन् पान
उंच उंच मान
लवलवते पाते घेई
हिरवीगार तान

तान बाई तान
रानभरी तान
दरीतली पाने देती
खरेखुरे ध्यान...

खरी खरी खरी
खोल खोल दरी
दरीमध्ये खोल खोल
आहे माझी परी....

संपर्क : ९८६०३८७१२३.

नितीन पोतदार

# लहान कल्पना, मोठं स्वप्न, मोठं यश!

## सत्य घटनांवर आधारित, शाळकरी वयात लावलेले, जग बदलणारे तीन शोध

माझ्या शाळेतील लहान मित्रांनो, तुम्ही कधी शाळेत जाताना टिफिन विसरलात का?
किंवा घरी नळ चालू राहिलाय आणि कोणी तो बंद करायचं विसरलं का?
किंवा आई-बाबांना हाताने धुणं धुताना त्रास होतोय हे पाहिलं का?
हे सगळं रोजचं, नेहमीचं वाटतं - पण काही मुलांनी या समस्यांवर विचार केला
आणि त्यांनी शोधले काही छोटे पण अफलातून उपाय!'
आज आपण बघणार आहोत अशा 'तीन सत्य घटनांवर आधारित विद्यार्थ्यांचे शोध'
जे भारतभर ओळखले गेले आहेत आणि ज्यांनी एक आदर्श निर्माण केला आहे!

### १. डबा विसरू नकोस! – टिफिनची आठवण देणारं ॲप

***कविता तिवारी,***
*इयत्ता ८वी, उत्तर प्रदेश*



कविता आपल्या भावाबरोबर रोज शाळेत जायची. पण तिचा भाऊ हमखास आपला डबा विसरायचा. आई वैतागलेली, आणि कविता विचारात – 'यावर काही उपाय करता येईल का?'

तिनं तयार केलं एक 'स्मार्ट टिफिन बॉक्स'– जो दररोज शाळेच्या वेळेला आवाज देतो, 'डबा विसरू नकोस!'

ही कल्पना इतकी छान होती की तिला IGNITE Award मिळाला आणि तिचा डबा आता तिच्या शाळेतल्या अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा ठरतोय!



## २. वीज नाही? चालेल! – सायकलवर चालणारं वॉशिंग मशीन

***जसवंत राही,** इयत्ता ९वी, राजस्थान*

जसवंतच्या गावात वीज सतत जायची. आईला कपडे धुणं खूप कठीण जायचं. एक दिवस जसवंतने ठरवलं – 'आईसाठी काहीतरी वेगळं करायचं!' त्याने जुन्या सायकलच्या भागांतून बनवलं पायाने चालणारं वॉशिंग मशीन!

सायकलचे पायडल फिरवायचे – की, ड्रम फिरतो आणि कपडे धुतले जातात. त्याचं हे मशीन गावात आणि शाळेत खूप कौतुकास पात्र ठरलं. राष्ट्रीय स्तरावर नॅशनल इनोव्हेशन फाऊंडेशनकडून त्याची प्रशंसा झाली आहे. साधं यंत्र, मोठा बदल – घरातही आणि समाजातही!

## ३. पाणी वाया जाऊ नये म्हणून टायमरवाला नळ

***नितीन परमार,** इयत्ता ७ वी, गुजरात*

शाळेत नितीनच्या वर्गात मुलं हात धुतल्यावर नळ बंद करत नसत. पाणी नाहक वाया जायचं. नितीनने ठरवलं – ''हे थांबायलाच हवं!''

त्याने तयार केला टायमर नळ – एकदा नळ चालू केला की तो २० सेकंदांनंतर आपोआप बंद होतो. त्याचं हे मॉडेल IGNITE Award मध्ये निवडलं गेलं, आणि आता अनेक शाळांमध्ये असा नळ बसवण्याचा विचार सुरू आहे!

प्रश्न पाहिला – उपाय शोधला – आणि काम सोपं झालं! मुलांनी विचार करणं, चर्चा करणं, प्रयोग करणं हेच पुढचं यश!

या तीनही मुलांनी काय केलं?




- आपल्या घरातली, शाळेतली अडचण पाहिली.
- त्यावर विचार केला.
- आई-बाबा, शिक्षकांशी चर्चा केली.
- वाचलं, पाहिलं, आणि प्रयोग केला.

मग तुम्ही का थांबायचं? तुमच्याही शाळेत काही अडचणी आहेत का? घरात, वर्गात, गल्लीबोळात, बसमध्ये? एक वही काढा - 'माझे निरीक्षण - माझे शोध' असं त्याचं नाव ठेवा. लिहा, बोला, कल्पना मांडून बघा - आणि त्या विचाराला कृतीत आणा!

## पालकांसाठी काही सूचना

प्रिय पालकहो,

आपली मुलं विचार करत आहेत - कधी बोलून, कधी गप्प राहून. त्या विचारांना दिशा द्या, संधी द्या. चूक होईल, प्रयोग फसतील, पण आत्मविश्वास वाढेल. आपण मुलांना 'विचार करणं' शिकवलं तरच ते स्वतःचं भविष्य घडवतील - आणि आपला समाजही!

## शाळेसाठी एक विनंती...

आजच्या बदलत्या जगात विद्यार्थ्यांमध्ये विचार करण्याची, प्रश्न विचारण्याची आणि काही नवीन करायची सवय लहान वयातच विकसित होणं गरजेचं आहे.

शाळांनी दर महिन्याला एक 'शोध चर्चासत्र' घ्यावं, जिथे मुलं आपले निरीक्षण, कल्पना आणि छोट्या अडचणींवरचे उपाय सादर करू शकतील.

एखादा 'मिनी इनोव्हेशन डे', शाळा पातळीवरील उद्योजकता प्रकल्प, किंवा वास्तविक उदाहरणांवर आधारित प्रेरणादायी कथा वाचन अशा छोट्या कृतींमधून एक मोठा बदल घडू शकतो.

मुलांना फक्त यश म्हणजे काय हे वरवर सांगू नका - त्यांना विचार करू द्या, चुका करू द्या आणि प्रयोग करू द्या! त्यातूनच उद्याच्या भारताचा नवीन संशोधक, उद्योजक घडेल..

**संपर्क : ९८२००५४७४७**

# चला चित्र रंगवूया...!!!

रेश्मा बर्वे

**वर्षाने आपल्या लाडक्या बाहुलीसाठी इंद्रधनुष्यातील सात रंगांचे सात पोशाख शिवले. कोणकोणते रंग असतील बरं? चित्र पूर्ण करा अन् छानसे रंगवा.**




ग्रीक न्यायदेवता : थेमीस

अच्युत गोडबोले

भाग ७

# न्यायसंस्थेत AI

भारतीय न्यायसंस्थेसमोरचं एक आव्हान म्हणजे प्रचंड प्रमाणात असणाऱ्या प्रलंबित जुन्या केसेस. २०२४ मध्ये भारतामध्ये एकूण प्रलंबित केसेसची संख्या ५.१ कोटी पेक्षा जास्त होती. यात तालुका आणि जिल्हा पातळीवर असणाऱ्या न्यायालयांमधल्या प्रलंबित केसेसची संख्या जवळपास ४.३ कोटी होती. विशेष म्हणजे यामध्ये एक लाख केसेस अशा होत्या की ज्या ३० वर्षांपेक्षाही जुन्या होत्या! एका केसचा निकाल तब्बल ७२ वर्षांनी लागला! खरंतर 'तारीख पे तारीख' म्हणजे एका प्रकारचा अन्यायच असतो, कारण प्रलंबित केसेसची संख्या कोविड कालखंडात वाढली. २०२१ मध्ये भारताचे त्या वेळचे सरन्यायाधीश शरद बोबडे यांनी हा प्रश्न सोडवण्याच्या दिशेनं पाऊल उचलत SUPACE या पोर्टलची सुरुवात केली.

SUPACE म्हणजे Supreme Court Portal for assistance in Courts Efficiency. केसचा निकाल लावण्यासाठी SUPACE कशी मदत करते? केसशी संबंधित असणाऱ्या कागदपत्रांच्या गठ्ठ्यांतून आपल्याला हवे असणारे मुद्दे (facts) शोधून काढणं हे न्यायाधीशांसाठी एक वेळखाऊ काम असतं. SUPACE नेमकं इथेच न्यायाधीशांना मदत करतं. SUPACE पोर्टल कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाचा वापर करतं. SUPCE मधला चॅटबॉट केसशी संबंधित कागदपत्रं वाचून केसचा सारांश न्यायाधीशांना सांगतो. तसंच तो न्यायाधीशांना हवी असणारी माहिती कागदपत्रांमधून शोधून सादर करतो. मग न्यायाधीशांसाठी निर्णय घेण्याचं काम सोपं होतं. त्यामुळे केसचा निकाल लावण्यासाठी न्यायाधीशांना मदत होते. SUPACE पोर्टलसारख्या सुधारणांमुळे आपल्याकडच्या प्रलंबित केसेस कमी होण्यासाठी नक्कीच मदत होईल.

भारतीय न्यायसंस्थेत कृत्रिम बुद्धीमत्ता (AI) तंत्रज्ञानानं केलेली अजून एक महत्त्वाची सुधारणा म्हणजे SUVAS सॉफ्टवेअर. SUVAS म्हणजे सुप्रीम कोर्ट विधीक अनुवाद सॉफ्टवेअर. कोर्टानं इंग्रजी भाषेत दिलेले निर्णय हे सॉफ्टवेअर AI तंत्रज्ञान वापरत स्थानिक भाषेत अनुवादित करते. हे सॉफ्टवेअर वापरत कागदपत्रांचं स्थानिक भाषेतून (भारतातल्या प्रमुख दहा भाषा) इंग्रजी भाषेत किंवा इंग्रजी भाषेतून स्थानिक भाषेत पटकन भाषांतर करता येते. यामुळे वेळ आणि कष्ट हे दोन्ही वाचतात.

भारताप्रमाणेच इतर देशांमधल्या न्यायसंस्थांमध्येही AI तंत्रज्ञानाचा वापर होतो. अमेरिकेमधले न्यायाधीश कंपास (COMPAS - Correctional Offender Management Profiler for Alternative

Solutions) नावाचं सॉफ्टवेअर काही केसेसमध्ये निर्णय घेताना वापरतात. एखादा गुन्हेगार पुन्हा गुन्हा करण्याची किती शक्यता आहे ते कंपास सांगतं. यासाठी ते गुन्हेगारानं पूर्वी केलेले गुन्हे, त्याची सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमी आणि त्याची मानसिक स्थिती यांचा अभ्यास करतं आणि AI तंत्रज्ञान वापरत त्या गुन्हेगारानं पुन्हा गुन्हा करण्याच्या शक्यतेविषयी भाकीत करतं.

सामान्य लोकांना कोर्टाच्या प्रक्रियेविषयी, कोर्टकामाच्या वेळापत्रकाविषयी, सुनावणीविषयी बरेच प्रश्न असतात. अमेरिकेत या प्रश्नांची उत्तरं देण्याचं काम चॅटबॉट्स करतात. यामुळे लोकांनाही उत्तरं पटकन मिळतात आणि न्यायसंस्थेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे लोकांना उत्तरं देण्याचे कष्टही वाचतात. हे चॅटबॉट्स अर्थातच AI तंत्रज्ञान वापरतात.

चीनमधले न्यायाधीशही आपला निर्णय देण्यापूर्वी AI तंत्रज्ञानाची मदत घेतात. AI तंत्रज्ञानानं त्यांना आताच्या केससारख्या पूर्वी होऊन गेलेल्या केसेस, त्या वेळी दिलेले निर्णय पाहायला मिळतात. AI सॉफ्टवेअर त्यांना गुन्हेगाराला काय शिक्षा द्यायला हवी हेही सुचवतो! मग न्यायाधीशांचं काम सोपं होतं.

भारत, अमेरिका आणि चीन यांच्याप्रमाणेच इतरही अनेक देशांमध्ये न्यायसंस्थांमध्ये AI तंत्रज्ञानानं प्रवेश केला आहे. पण एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी, AI तंत्रज्ञान न्यायाधीशांना निर्णय घेण्यात कितीही मदत करत असलं तरी ते स्वतः केसच्या निकालाचा निर्णय (अजून तरी) देत नाही !

AI चा वापर फक्त न्यायाधीशच करतात असं नाही तर वकीलही करतात. एखाद्या करारामध्ये काही चूक असेल आणि आपल्या वाचनातून ती सुटली असेल तर AI तंत्रज्ञान वकिलांच्या कामी येते. आजकालची AI सॉफ्टवेअर्स करारातल्या चुका शोधू शकतात. यामुळे वकिलांचा वेळ वाचतो. Quick Check सारखी AI तंत्रज्ञानावर आधारित सॉफ्टवेअर्स कायदेशीर कागदपत्रं पाहून त्यात योग्य त्या अधिकाऱ्यांची मंजुरी (approval) आहे का ते तपासू शकतात.




AI चा वापर करत आजच्या जमान्यातली सॉफ्टवेअर्स नवीन करारांचा मजकूरही तयार करू शकतात.

उद्याच्या जगात AI मुळे कोर्टाचे निकाल कमीतकमी वेळेत लागतील अशी आपण आशा करायला हरकत नाही!

**संदर्भ :**

1. https://indiaai.gov.in/case-study/enhancing-the-efficiency-of-india-s-courts-using-ai
2. https://www.youtube.com/live/UMJ5ojTOXzM?si=Qqkjhdo8M3lJEdd
3. https://www.drishtiias.com/daily-news-analysis/ai-portal-supace/printšmanually
4. https://www.barandbench.com/columns/artificial-intelligence-in-context-of-legal-profession-and-indian-judicial-system
5. https://businesslawtoday.org/2022/02/how-ai-is-reshaping-legal-profession/
6. https://commons.m.wikimedia.org/wiki/File:Goddessšofšjustice.jpg - image in public domain

**संपर्क** : achyut.godbole@gmail.com



बालभारती

# अभिजात मराठी

मराठी भाषा विभाग

भाषा जनाची | भाषा मनाची

नुकताच मराठी भाषेला 'अभिजात' भाषेचा दर्जा प्राप्त झाला आणि सगळ्या मराठी भाषिकांची मान अभिमानाने उंचावली. हजारो वर्षांची परंपरा लाभलेली आपली मराठी ही जगातील एक महत्त्वाची भाषा आहे. मराठी भाषेच्या या वारशांचा सन्मान करणे आणि पुढील पिढ्यांकडे तो अधिक समृद्ध रूपात सुपूर्द करणे हे आपले कर्तव्य आहे. मराठी अभिजात भाषा झाली आता तिची वाटचाल ज्ञानभाषेकडे होणे आवश्यक आहे. या प्रयत्नात खारीचा वाटा म्हणून विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी जागरूकता वाढवण्यासाठी 'बालभारती' आणि महाराष्ट्र शासनाचा 'मराठी भाषा विभाग' मिळून 'अभिजात मराठी' हा उपक्रम राबवत आहोत. या विविध सदरांच्या माध्यमातून दरमहा सहा पाने मराठी भाषेच्या गौरवासाठी राखीव ठेवण्यात येणार आहेत. आपण सारे मिळून मराठी भाषेचे जतन व संवर्धन करूया.

प्रवीण दवणे

# पाऊस शब्दांचा : नादातील बरसातीचा!

आता आकाश, आभाळ होऊन ढगाळ झाले आहे. शब्दांशिवाय निसर्गाचे शब्द नादातून ऐकू येत आहेत. मग ह्या वातावरणात जे नाद प्रत्यक्ष शब्द होऊन जसेच्या तसे प्रकटू शकत नाहीत, तरीही तो नाद टिपण्याचा प्रयत्न करतात असे एकाहून एक टपोरे शब्द आपण वेचूया!

गमतीची गोष्ट ही की, त्या नादशब्दातूनही विविध छटा व्यक्त होतात. एकाच निसर्ग घटनेची किती वेगवेगळी रूपे असतात, ती या शब्दांतून तुमच्यासमोर उभी राहतील.

आता पावसाळा आहे, तर तिथूनच सुरू करूया. पाऊस कधी एकाच प्रकारचा बरसतो का? मग कसा?

**कधी सरसर! कधी टपटप,**
**कधी रिमझिम, कधी मुसळधार!**
**कधी, धुवांधार! तर केव्हा घनघोर!**

पहा: प्रत्येक शब्दातील पाऊस एकाच प्रकारचा नाही. कधी खूप पाऊस पडून त्याचा जरा कंटाळा आला की, तीच 'रिपरिप' होते. पावसाची वेगवेगळी रूपे घेऊन हे शब्द येतात! सारे शब्द योग्य प्रकारे वापरून तुम्ही त्यापासून वाक्ये तयार करा, नि वर्गातल्या मराठीच्या शिक्षकांची शाबासकी मिळवा.

आता या पाऊस ओल्या वातावरणात कागदावर न उमटवता येणारे केवढे ध्वनी उमटतात; पण तेही आपण शब्दात मांडत असतो.

पहा, पावसात वीज चमकते. मग विजेची रूपे




व्यक्त करणारे शब्द टिपूया.

विजेचा, कधी चमचमाट!

कधी लखलखाट! तर जेव्हा मन दडपून टाकणारा कडकडाट! ढगांचा गडगडाट! कधी वारा घोंघावत येतो, तर तो कधी सोसाट्याचा! कधी शांत झुळझुळतो! किती शब्द आपल्या समृद्ध मराठी भाषेत आहेत ते थोडा विचार करून शोधा. असे वस्तू सारखे प्रत्यक्ष न दिसणारे पण नजरेसमोर नक्कीच एक रूप उभे करणारे हे शब्द! संत ज्ञानेश्वर महाराज प्रतिज्ञा घेतात, 'बोली अरूपाचे रूप दावीन'

केवढी थोर प्रतिज्ञा! न दिसणाऱ्या, पण जाणवणाऱ्या नाद, स्पर्श, रूप, रस, रंग, गंध यांनाही प्रकट करण्याचा मी प्रयत्न करेन, माऊलींच्या ह्या प्रतिज्ञेचा प्रत्यय मराठी भाषा देते.

अजून असेच काही नादावणारे शब्द टिपायला तुम्हाला आवडेल ना?

पाऊस, वीज यांची नादरूपे अनुभवताना तुम्ही भिजलात ना? जवळच्या वाचनालयातून कविवर्य कुसुमाग्रज यांचा 'विशाखा' काव्यसंग्रह मिळवा. त्यातील 'वर्षागमन' कविता दोन तीनदा वाचा. 'सजल श्याम घन गर्जत आले' तसेच कविवर्य बा. भ. बोरकर यांची चांदणवेल मधील,'सरींवर सरी आल्या गं' किंवा 'गडद निळे, गडद निळे, जलद भरून आले' ही कविता मजेने, तालासुरात म्हणा! आपल्या मराठी शब्दांच्या सुंदरतेची ही खाण तुमची वाट पहातेय.

असेच अनेक शब्द तुम्ही हौसेने टिपा. शब्दाशी मैत्री झाली की हा शब्दमित्र तुम्हांला शब्दांच्या पलीकडील, 'ह्या नगराला लागुनिया' असलेली, 'सुंदर ती दुनिया' दाखवेल, नि सृष्टीची कितीतरी गुपिते दाखवेल! हे भाग्य तुम्हांला लाभले आहे, कारण तुम्ही भाषेच्या अंगणातील फुले कुतूहलाने वेचत आहात! बाहेरच्या पावसाला असा मनातला पाऊस भेटला, की केवळ मातीच नाही तर मनही रुजून येते. गोष्टी, कवितांच्या इंद्रधनुष्याने आपले किशोरपण रंगीत होते!

**संपर्क : ९८२०३८९४१४**

डॉ. नीलिमा गुंडी

# रांगेत चालायचं




किमयाने शाळेतून आल्या आल्या आईला उगाचच मिठी मारली. आई म्हणाली, ''अगं, घरी आल्यावर आधी हातपाय नाही का धुवायचे? कामं कशी ठरल्याप्रमाणे एकानंतर एक रांगेत व्हायला हवीत! मी तुला शाळेत जायच्या आधी डबा वेळेवर करून देते नि मग माझी इतर कामं करते. हो किनई?'' ''हो बाई! तुझं सारखं शिस्त लावणं चालू असतं!'' किमया पुटपुटली. ''अगं, अशी चिडचिड करून कसं चालेल. एखादद्या दिवशी पृथ्वीनेच फिरायचा कंटाळा केला नि राहिली थांबून, तर काय



होईल आपलं? सगळ्या गोष्टींचा क्रम ठरल्याप्रमाणे पाळावा लागतो! हा नियम तुमच्या भाषेलासुद्धा लागू आहे बरं!'' आईनं तिला प्रेमानं थोपटत समजावलं.

''अगं आई, तू म्हणतेस ना, भाषेला पण अक्षरांचा क्रम, म्हणजेच रांगेचे नियम असतात; ते खरंच आहे! मला आजीनं एक गोष्ट सांगितली होती. कुणाला तरी 'राम' 'राम' असा जप करायला सांगितला, तर त्यानं म्हणे, 'मरा' 'मरा' असंच म्हटलं. मग त्याला सराव केल्यावर नीट म्हणता यायला लागलं! अर्थच बदलला की अक्षरांचा क्रम चुकल्यावर!'' किमयाला आता आईकडून मोठीच शाबासकी मिळाली. आई म्हणाली, ''अगं, एरवीसुद्धा आपण रांगेत उभं असताना कोणी मध्येच घुसलं, उगाच गर्दी केली, तर त्याचा सगळ्यांनाच त्रास होतो. नाही का? तसा भाषेतही शब्दामध्ये अक्षरांचा क्रम पाळायला हवाच! आता बघ, तू 'टपक' 'टपक' असा थेंबाचा आवाज दाखवणारा शब्द लिहिताना अक्षरांचा क्रम चुकवलास नि 'कपट' 'कपट' लिहिलंस, तर काय होईल? चूकच ठरेल ना ती!''

''खरंच गं! आई मी अक्षरांचा क्रम मोडल्यावर होणाऱ्या गमतीदार चुकांची उदाहरणे लिहिते. सांग ना तू असे शब्द!'' किमया लाडात येऊन म्हणाली. आईने तिला शब्द घातले. ते असेः ''हं, लिही! राधा, मका, ताजे, खारे, वारे'' ''आई, हे बघ काय झालं. धारा, काम, जाते, रेखा, रेवा'' सगळे शब्द बदलून गेले गं!'' किमयाला हसू आवरेना.

''तुझ्या लक्षात आलं नाही! तू 'ताजे' शब्द लिहिताना फक्त अक्षरांचाच क्रम बदलला नाहीस, तर अक्षरचिन्हांचाही क्रम बदलला आहेस. तू 'जेता' असं न लिहिता 'जाते' असं लिहिलं आहेस! थांब, आता अक्षरचिन्हं पहिल्या अक्षरावरची दुसऱ्या अक्षरावर अशी क्रम बदलून आली की काय गोंधळ होतो ते पाहू! लिही : निज, गार, वाचणे, सार''

''हे बघ काय झालं, जिना, राग, चावणे. रास... खरंच गं!'' किमयाला हा नवा खेळच वाटू लागला.




शेवटी आई तिला म्हणू लागली, ''अगं, तुला खेळ म्हणून अशी रांगेत न राहणारी अक्षरे, अक्षरचिन्हे पाहताना बदललेला अर्थ कळल्यामुळे आज गंमत वाटतेय! पण यामुळे जे नेमकं म्हणायचं आहे, ते तुला कळणारच नाही. त्याचं काय? मग रडत बसायची वेळ येईल! तुला रोज लागणारा 'डबा' 'वही' यांचे रूप काय होईल? बाड, हीव मिळेल. का मग हवं ते तुला?'' आईच्या या शब्दांमुळे किमया जरा गंभीर झाली.

तेवढ्यात आबा आले नि म्हणाले, ''माझ्या बॅगेचं आकड्यांचं कुलूप उघडत नाही गं! माझा नंबर आठवतोय का तुला बरोबर? ४२१ होता ना?'' ''नाही हो आबा! ४२१ नंबर बरोबर नाही. तुमच्या कुलपाचा नंबर तुम्ही २४१ असा तयार केला होता. कारण तुमचा वाढदिवस २४ तारखेला असो ना, जानेवारीमध्ये! आता आठवलं का?'' किमयाच्या आईच्या या सांगण्याला आबांनी मान डोलवली. दोन मिनिटांत त्यांच्या बॅगेचं कुलूप उघडलं सुद्धा!

किमया टाळी वाजवत म्हणाली, ''आई, आकड्यांचं कुलूप उघडायला जसे ठरावीक आकडे ठरावीक क्रमानेच लागतात, तसंच शब्दांचं आहे! अर्थाचं कुलूप उघडायला शब्दामधली अक्षरं ठरावीक क्रमानं रांगेतच हवीत! पटलं तर मला!'' असं एकीकडे म्हणत ती खट्याळपणे पुढे म्हणाली, ''मी आता हे जोर-चुकलं बरं! रोज लक्षात ठेवीन!'' आणि ती बाहेर खेळायला गेलीसुद्धा!

**संपर्क** : ०२०-२४४८६०१५

# गंमत शब्दांची

प्रा. विश्वास वसेकर

संपर्क : ९९२२५२२६६८

## जोगवा



ग्रामीण भागात यल्लमा, रेणुका यांसारख्या देवतांचे स्त्री–पुरुष उपासक या देवीच्या नावे पाच घरे भिक्षा मागत. या भिक्षेला ‘जोगवा’ असे म्हणत. अर्थात पोट भरण्यासाठी मागितलेली ही भीक नाही. तर ती देवीच्या नावे, देवीचा प्रसाद म्हणून घेतली जाते. तुळजाभवानी, अंबाबाई यांच्याही नावाने असा ‘जोगवा’ मागितला जातो. हा जोगवा शिजवलेल्या अन्नाचा दिला वा घेतला जात नाही. तो कोरडा असतो. धान्य किंवा धान्याचे पीठ आणि मीठाचे चार खडे हे जोगवा म्हणून घालतात. काही उपासक परडी घेऊन देवीच्या नावे जोगवा मागतात. मंगळवार, शुक्रवार, अमावस्या या दिवशी हक्काने ती मागितली जाते.



## दुरडी

बांबूच्या बारीक पट्ट्यांपासून बनवलेले, टोपल्याच्या आकाराचे साधन म्हणजे दुरडी. ही दुरडी भाकरी ठेवण्यासाठी किंवा एखादी वस्तू, धान्य ठेवण्यासाठी उपयोगी पडते. खळ्यात धान्य, कणसे भरून ठेवण्यासाठी किंवा धान्य उधळण्यासाठी दुरडी शेतकऱ्याच्या उपयोगी पडते. शेतातील मिरची, वांगी, भेंडी, चवळी, मूग, उडदाच्या शेंगा तोडण्यासाठीही शेतकऱ्याला दुरडी उपयोगी पडते.

## भुजगावणे/बुजगावणे



पोकळ भीती दाखवणारी फसवी वस्तू किंवा पशुपक्ष्यांना भीती दाखवण्यासाठी उभे केलेले बाहुले; पशुपक्ष्यांनी शेतातील पिके खाऊ नयेत, पिकाची नासाडी करू नये म्हणून माणसासारखे भासणारे हे बाहुले उभे केले जाते. त्याला माणूसच समजून पशुपक्षी तिकडे येत नाहीत ते फसतात. यास बुजाणे, भुजवणं असेही म्हणतात.



## मांडव

जमिनीपासून आठ दहा फूट उंच, चारही बाजूंना लाकडी खांब/धारणे रोवून त्यावर आडवी लाकडे टाकून मांडव तयार केला जातो. वर झाडाच्या फांद्या किंवा ताटवा टाकला जातो. याचा उपयोग शेतकरी कारली, दोडके, काकडी अशा वेलींना आधार देण्यासाठी करतात. द्राक्षाच्या वेलींना आधार देण्यासाठी तारांच्या जाळीचा मांडव तयार केला जातो.

# प्रश्नमंजुषा

**उदय कदम**

**१) मोडीलिपीचा शोध खालीलपैकी कोणी लावला?**

१) हेमंत पंडित २) हेमाद्री पंडीत
३) राजा रामदेवराय ४) यापैकी नाही

**२) नाणेघाट शिलालेख कोणत्या लिपीत कोरलेला आहे?**

(२) नागरी लिपी (२) ब्राह्मी लिपी
(३) खरोष्ठी लिपी (४) देवनागरी लिपी

**३) 'गाथा सप्तशती' हा ग्रंथ कोणी संकलित केला?**

(१) सातकर्णी राजा (२) शालिवाहन
(३) राजा हाल (४) नागनिका राणी

**४) पहिले जागतिक मराठी साहित्य संमेलन कोठे पार पडले?**

१. दुबई २. अमेरिका
३. मुंबई ४. दिल्ली

**५) बालकवी यांचे पूर्ण नाव काय आहे?**

१. त्र्यंबक सोनदेव ठोंबरे
२. त्र्यंबक आबाजी ठोंबरे
३. त्र्यंबक बापूजी ठोंबरे
४. वसंत आबाजी डहाके

**६) 'पहिले मराठी संत साहित्य संमेलन' कोणत्या वर्षी भरले होते?**

१) २०१० २) २०१२ ३) २०११ ४) २०१३

**७) "या नभाने या भुईला दान द्यावे आणि या मातीतून चैतन्य गावे..." असे कोणत्या कवीने म्हटले आहे?**

१. नामदेव ढसाळ २. ना. धो. महानोर
३. इंद्रजित भालेराव ४. कुसुमाग्रज

**८) वऱ्हाडी भाषा प्रामुख्याने विदर्भाच्या कोणत्या जिल्ह्यामध्ये बोलली जाते?**

१. अकोला २. बुलढाणा
३. वाशिम ४. वरील सर्व पर्याय बरोबर

**९) व्याकरणदृष्ट्या बरोबर असलेला शब्द ओळखा.**

१) औपचारीक २) तीर्थस्वरूप
३) दिपक ४) मनस्थिती

**१०) "महापुरे झाडे जाती, तेथे लव्हाळे वाचती" असे खालीलपैकी कोणी म्हटले आहे?**

१. संत ज्ञानेश्वर महाराज
२. संत तुकाराम महाराज
३. संत एकनाथ महाराज
४. संत नामदेव महाराज


**प्रश्नमंजूषा जूनची २०२५ ची उत्तरे**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ – १ | २ –३ | ३–२ | ४–२ | ५–२ |
| ६–१ | ७–३ | ८–३ | ९–३ | १०–२ |

संपर्क : ९७६७३१३८४३

मनोहर भोसले

# मचक पचक



बिट्टी हट्टी होता. दररोज शाळेला जाताना रडायचा. आदळआपट करायचा. आईकडून एक दोन रुपये घेतल्याशिवाय शांत व्हायचा नाही. शाळेत जायचा नाही. त्याच्या त्रासातून मुक्त होण्यासाठी आईसुद्धा पैसे द्यायची आणि रिकामी व्हायची. पण, या पैशांचं तो काय करतो? याचा तिने विचार केला नाही.

शेजारची दोन मुलं बिट्टूच्या वर्गातच होती. त्यांचे नाव होते जय आणि विजय. आईने त्यांना विचारलं,

''काय रे जय, विजय...आमचा बिट्टू शाळेत काय काय करतो?''

''कुडाऽम कुडूऽम. मचक पचक करतो.''

जयने मोठ्या गमतीनं उत्तर दिलं. बिट्टूच्या आईला काहीच कळलं नाही. विजयने मात्र स्पष्ट सांगितलं,

''शाळेत जायच्या अगोदरच तुमचा बिट्टू दुकानात जातो आणि चॉकलेट, गोळ्या घेतो.''

''तास सुरू असतानाच खातो.''

''आमच्या बाई त्याला सारखं रागावतात. तरीही त्याचं सुरूच असतं. मचक पचक.''

जय, विजयचं हे बोलणं ऐकून आईला वाईट वाटलं.

एक दिवस तिने बिट्टूचे दप्तर तपासले. खरोखरच त्यात चॉकलेट होते. त्याला मुंग्या लागल्या होत्या. मुंग्यांची एक लांबलचक रांग भिंतीवरून दप्तरापर्यंत आली होती. ते पाहून आई अस्वस्थ झाली. बिट्टूला कसं समजून सांगायचं हे तिला कळेनासं झालं होतं.

रविवार होता. शाळेला सुट्टी होती. मुलं अंगणात खेळत होती. अशा वेळी अचानक एक मदारी डमरू वाजवत आला.

*'चल जमुरे...*
*हो जा शुरू...*
*खेल दिखा महागुरू.'*

कुडमुड कुडमुड असा डमरूचा आवाज ऐकून मुलं धावत आली. गल्लीबोळातल्या, घराघरांतल्या महिल्या बाहेर आल्या. सगळे मदाऱ्याभोवती गोळा झाले. माकडाला पाहून अनेकांना आनंद झाला.

*'चल जमुरे...*
*सबको सलाम कर...'*

असं म्हटल्याबरोबर कपाळावर हात ठेवून माकड उभे राहिलं. सगळ्यांनी टाळ्या वाजवल्या. मदारी सांगेल तसं माकडं ऐकत होतं. उड्या मारत होतं.

कुणी पैसे दिले. कुणी धान्य दिलं. कुणी भाजी, भाकरी दिली. जे मिळेल ते मोठ्या आनंदानं मदाऱ्यानं घेतलं. बिट्टूची आईसुद्धा मदाऱ्याजवळ गेली. तिने आपल्या जवळचे पैसे दिले आणि हळूच काहीतरी त्याला सांगितलं. पण काय सांगितलं कुणास ठाऊक? मदारी खूश होता.

सिनेमातला हिरो डान्स कसा करतो, हीरोइन कशी लाजते असे एक न् अनेक अभिनय माकडाने करून दाखवले. योगायोगाने माकडाने जय, विजयची नक्कल करून दाखवली. मदारी म्हणाला, ''चल जमुरे.. जयचं नाक कसं आहे दाखव.''

माकडाने मान हलवून स्वतःचं नाक पुसलं.

“चल जमुरे..

विजय शाळेला कसा जातो दाखव.”

माकडाने एका हाताने दप्तर आणि दुसऱ्या हाताने स्वतःची चड्डी धरल्यासारखं केलं. दोन-चार पावलं चालून दाखवली. खेळ बघायला आलेले सगळे मोठमोठ्याने हसू लागले. बिट्टूलाही खूप गंमत वाटत होती. त्यानं जय, विजयला थोडं चिडवलं. पण माकडानं त्याची गंमत केली तेव्हा बिट्टूची खरी फजिती उडाली.

“चल जमुरे..

बिट्टूचे दात दाखव कसे आहेत?”

माकडाने स्वतःचं तोंड झाकून घेतलं. ते बघून जय, विजयला आनंद झाला. मगाशी हा आपल्याला चिडवत होता. आता त्याला चिडवायची संधी यांना मिळाली होती. मदारी म्हणाला, “अरे...काय झालं?”

‘काही नाही. काही नाही’ म्हटल्यासारखं करत माकडाने मान हलवली.

“दात किडलेत का?”

‘होय होय’ म्हटल्यासारखं माकडाने पुन्हा मान हलवली.

“चॉकलेट खातोस का?”

माकडाने मान हलवण्याअगोदर जय ‘मचक पचक’ म्हणून मोठ्याने ओरडला. माकडाचा खेळ पाहायला आलेले सगळे हसायला लागले. बिट्टूची आई पाहात होती. तिनं बिट्टूचा चेहरा पाहिला. त्यानं मान खाली घातली होती. मदारी माकडाला म्हणाला, “अरे मेरे बाबू...बिट्टू के छोड. तुझे दात तर चांगले आहेत ना?”

‘होय होय’ म्हटल्यासारखी माकडाने मान हलवली.

“मग तुझे दात दाखव.”

माकडाने तोंडावरचा हात बाजूला केला. इऽऽ करून पांढरे शुभ्र दात दाखवले. सगळ्यांनी टाळ्या वाजवल्या.

“वाह..वाह..छान! अरे पण तू दात घासत नाहीस. तरी तुझे दात स्वच्छ कसे?”

हाच प्रश्न बिट्टूच्या मनात निर्माण झाला होता. उत्तर मात्र मदाऱ्यानच दिलं,

“तू चॉकलेट, गोळ्या, बिस्कीटं खात नाहीस.”

माकडाने मान हलवून ‘नाही नाही’ म्हटलं.

“मग काय खातोस...फळं, पानं, फुलं, भाजीपाला?”

“म्हणूनच तुझी तब्येत चांगली आहे. तू स्ट्राँग आहेस. मजबूत आहेस.”

“आता सगळ्यांना सांग. रोज सकाळ संध्याकाळ दात घासले पाहिजे. हात, पाय, तोंड धुतलं पाहिजे. स्वच्छ राहिलं पाहिजे. तरच आजार होणार नाहीत.”

खेळ पहायला आलेले सगळे लोक लक्ष देऊन ऐकत होते. आपणही चॉकलेट, गोळ्या, बिस्किटं खायची बंद केली पाहिजेत असा विचार क्षणभर बिट्टूच्या मनात आला. एवढ्या लोकांमध्ये माकडाने केलेली चेष्टा त्याला जिव्हारी लागली होती. दररोज शाळेत जाताना आईकडे पैसे मागायचं त्यानं सोडून दिलं. हट्ट करायचं बंद केलं आणि अशा प्रकारे बिट्टूचं परिवर्तन झालं.

**संपर्क : ९७६७०४४५०९**

# अरे श्रावणा-श्रावणा

शिवाजी विखे



अरे श्रावणा - श्रावणा
यावे ढग तू होऊनी
ढग बरसावे असे
होऊ द्यावे पाणी-पाणी.

अरे श्रावणा-श्रावणा
यावे हिरवे लेऊनी
कडे आणि कपारीत
निर्झरांनी गावी गाणी.


अरे श्रावणा-श्रावणा
यावे इंद्रधनुसवे
दरीमध्ये लपलेल्या
झाडीला तू हसवावे.

अरे श्रावणा-श्रावणा
यावे अशा संध्येसवे
लाल सोन्याच्या गोळ्याने
गुलालासम पसरावे.

संपर्क : ७३९१०५६१७६

रोहिणी चव्हाण

# आठवणीतला बोराटाखेडा



सकाळी पावसाची रिपरिप सुरू झाली. काळ्या ढगांची तशी गर्दी आकाशात दिसत नव्हती, म्हणून गणा त्याचा बैल घेऊन रोजच्या सारखाच कामाला निघून गेला. दुपार होईपर्यंत पावसाने चांगलाच जोर धरला आणि एकाएकी आकाशात काळ्या ढगांची गर्दी जमा झाली आणि सोबतच त्या काळ्या शालूवर चंदेरी काठ चमकावा तशी वीजही अधूनमधून आवाजासह चमकत होती. पडणाऱ्या पावसाने आणि वाऱ्याने जंगलातली झाडं शहारून गेली. गुदगुल्या केल्यागत वेलीसुद्धा झाडाला बिलगल्या. नदी उधाणीला आली. असा हा अचानक पडलेला पाऊस मलाही नवखाच होता कारण शहरात पडणारा पाऊस मी असा कधी पाहिला नव्हता आणि बोराट्यात म्हणजे या जंगल परिसरात पडणारा पाऊस मलाही नवखाच होता. शहर आणि जंगल परिसरात पडणारा पाऊस यांची तुलना करणे कठीणच आहे. अशा पावसात गणा लगबगीने घरी निघाला. सोबत बैल घरी घेऊन जावं या विचाराने त्याने सागाच्या झाडाला बांधलेल्या बैलाच्या दावणीकडे वळला पण बघतो तर काय बैल जागेवर नव्हता. अचानक विजेच्या आवाजामुळे आणि वाऱ्याच्या सू... सू ... आवाजाने बैल बुजाला आणि दोर तोडून जंगलातच पळाला.

जंगलातल्या झाडांवर, बांबूवर जमा झालेली धूळ पडणाऱ्या पावसामुळे धुऊन गेली आणि अंघोळ घातलेल्या बाळागत जंगलातली सगळी झाडे, वेली स्वच्छ दिसत होती. सायंकाळ होत आली तरी पावसाने जराशीही उसंत घेतली नव्हती आणि गणाही बैल शोधण्यातच गुंतला होता. बैलाचं असं जंगलात निघून जाणं गणाला नवीन नव्हतं पण पावसामुळे बैल रात्रभर कुठे राहणार हाच विचार गणाला सैरभैर करत होता. हताश होऊन गणा रात्री उशीरा घरी परतला. त्याने तसाच भुरीला आवाज दिला, ''भुरी ओ भुरी डा साले'' (भुरी पाणी आण)

भुरी म्हणजे गणाची मुलगी. भुरीने गणाला पाणी आणून दिले सोबतच 'च्या नुनू बो' (चहा घ्यायला चल) म्हणत बापाला चुलीजवळ घेऊन गेली. एरवी संध्याकाळी बैलाच्या गळ्यातली घुंगराची माळ वातावरणात एक मधुर नाद उमटवायची पण आज तो नाद नव्हता. नाद होता तो फक्त पावसाचा आणि गडगडणाऱ्या विजांचा. गणाचे मन बैलाच्या आठवणीने व्याकूळ झाले आणि तो चुलीजवळून ताडकन उठला. चुलीवर ठेवलेला चहा तसाच निवळला आता. पाऊसही थोडा विसावला होता. रात्रीचे नऊ वाजले तरी गणा जीव मुठीत घेऊन बैल शोधायला जंगलात गेला.

पावसाच्या पाण्याची रिपरिप त्याला आज आवडेनाशी झाली होती कारण त्याचा जिवाभावाचा आणि संपूर्ण घराची जबाबदारी उचलणारा बैल सापडत नव्हता. पावसात फिरणारी चुकार पाखरं देखील घरट्यात बसून होती. बायकापोरी चुलीजवळ रांधायला लागल्या पण गणा एकटाच गावात नव्हता. तो शोधात होता बैलाच्या. जंगलातला चिखल तुडवत 'ड्यु ड्रो' करत बैलाला आवाज देत होता. पावसाची रिपरिप सुरू असली तरी त्याचा जोर मंदावला होता. रात्रभर गणाच्या जीवात जीव नव्हता की, कोणी हिंस्त्र प्राण्याने त्याच्या बैलाचा घात तर केला नसेल? गणा मनात महादेवाचा धावा करत बैल शोधत होता. आता सकाळ होत आली आणि रायपूर जवळच्या एका वावरात (शेतात) गणाला त्याचा बैल घाबरलेला अवस्थेत उभा दिसला. बैल दिसताच गणाने ड्रो-ड्रो असा आवाज दिला आणि आपल्या धन्याच्या आवाजाने ते मुकं जनावर भानावर आले आणि गणाच्या दिशेने धावतच सुटलं. सूर्यनारायण बांबूच्या तटबंधीत शिरला आणि गणाच्या कुशीत जाऊन त्याचा बैल विसावला. गणाच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. गणाने बैलाच्या पाठीवर प्रेमाने थाप मारली तसा बैल शहारला आणि दोघेही घराच्या दिशेने परतले. घरी रेखा आणि लेकरं गणाची घारीसारखी वाट पाहत होती. दोघेही सुखरूप आल्याचे पाहून रेखाच्या आणि लेकरांच्या चेहऱ्यावर स्मित हास्य पसरले.

**संपर्क : ९१३०७८२४७७७७**

# विनम्र आदरांजली



ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ, विज्ञान लेखक व प्रसारक डॉ. जयंत नारळीकर यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले. वयाच्या ८६ व्या वर्षी जयंत नारळीकर यांनी जगाचा निरोप घेतला. खगोलशास्त्रातील त्यांच्या संशोधनामुळे त्यांना जगभरात मान्यता मिळाली. त्यांनी १९८८ मध्ये पुण्यातील 'इंटर-युनिव्हर्सिटी सेंटर फॉर ॲस्ट्रोनॉमी ॲण्ड ॲस्ट्रोफिजिक्स' (आयुका) या महत्त्वपूर्ण संस्थेची स्थापना केली आणि त्याचे पहिले संचालक म्हणून त्यांनी कार्यभार सांभाळला.गणित आणि विज्ञान हे मुळातच किचकट वाटणारे विषय अगदी सामान्य माणसांपर्यंत रंजकपणे पोचवणारे ते एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व, जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक! 'विज्ञाननिष्ठा' आणि 'वैज्ञानिक दृष्टिकोन' ही मूल्यं भारतात रुजवण्याचा सातत्याने प्रयत्न करणारे विज्ञान-प्रसारक आणि अभिमानाने मराठीत लेखन करणारे ज्येष्ठ वैज्ञानिक, लेखक म्हणून डॉ. नारळीकरांचे नाव आदराने घेतले जाते किंबहुना 'मराठी वैज्ञानिक' म्हटले की नारळीकरांचाच चेहरा सर्वप्रथम आपल्या डोळ्यांसमोर येतो.

डॉ. नारळीकर हे केवळ खगोलशास्त्रज्ञच नव्हते तर वाचकप्रिय विज्ञान लेखकही होते. विज्ञान साहित्याच्या प्रचारात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. विज्ञान सोपे करून सांगण्यासाठी त्यांनी केलेलं मराठी विज्ञानकथालेखन महत्वाचे आहे. डॉ. जयंत नारळीकर यांच्या महत्वपूर्ण साहित्यिक योगदानामुळे नाशिक येथे भरलेल्या ९४व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. जयंत नारळीकर यांची निवड करण्यात आली होती. डॉ. जयंत नारळीकर यांना त्यांच्या योगदानाबद्दल पद्म विभूषण, पद्म भूषण या भारतीय नागरी सन्मानांसह अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी गौरवण्यात आले होते.

डॉ. जयंत नारळीकर यांना विज्ञानाचा प्रचार-प्रसार आपल्या मराठी भाषेतून आणि तोही साहित्यातून व्हावा असे मनोमन वाटायचे. वाचता येणाऱ्या सर्वसामान्य माणसाला, खेडोपाडी असणाऱ्या जनतेला आणि विशेषतः बाल-कुमार-किशोर-तरुण मुलामुलींना सहज, सोप्या, सुलभ भाषेत विज्ञान समजले पाहिजे ही त्यांची कळकळ होती. मुलांशी नाते जोडणे हे जणू डॉ. नारळीकरांसाठी 'आकाशाशी नातं जोडण्या'सारखेच होते. ते मुलांमध्ये रमणारे, मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवतानाच त्यांच्यात संशोधक वृत्ती जागवावी यासाठी विचार करणारे कृतिशील संशोधक होते.

आपल्या 'किशोर' मासिक आणि 'बालभारती'शी घट्ट नाते असलेल्या विज्ञान व विवेकवादी लेखकाचे आपल्यातून निघून जाणे ही आपणा सर्वांसाठी अतिशय दुःखद घटना. त्यांनी 'किशोर'करिता विपुल लेखन केले. 'किशोर' दिवाळी अंकातील डॉ. नारळीकरांच्या विज्ञानकथा म्हणजे तर मुलांबरोबरच पालकांसाठीही आनंदाची पर्वणी असायची. त्यांच्या विज्ञान कथांचा 'निवडक किशोर खंड' आणि 'निवडक किशोर गोष्टी भाग १' यात समावेश करण्यात आला होता. मराठी साहित्य आणि संस्कृतीविश्व समृद्ध, श्रीमंत करणाऱ्या, समाजात विज्ञाननिष्ठा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन या मूल्यांची पेरणी करणाऱ्या या थोर व्यक्तीला विनम्र आदरांजली.

**– बालभारती परिवार**

# शहरापासून दूर

■ गणेश भाकरे

शहरापासून दूर
माझं नदीकाठी गाव
शेणामातीच्या घरात
वावराची धावाधाव

कुणी नाही दाखवित
इथे श्रीमंतीचा थाट
प्रत्येकाला आवडते
गाव पांदणीची वाट

शाळा माझी खूप छोटी
वर्ग तिचे फक्त चार
सांभाळते नदीकाठी
गाव निसर्गाचा सार

वाटेवर भेटतात
खूप चिंचा अन् बोरं
गाव माझं छोटं आहे
पण आहे खूप थोर

यंत्र फक्त शेतीसाठी
माणसं गाळती घाम
ऐकायला कानी येते
आनंदाने राम राम

शाळेकडे जाता जाता
कशी हंबरते गाय
गाव माझं सुंदरच
त्याचे मातीवर पाय

संपर्क : ९९२३८२९७१७



राहुल संखे

# आर्वी आणि खारुताई



काय मस्त पाऊस पडत होता. आज वातावरण अगदी थंड झालं होतं. आर्वीला पाऊस खूप खूप आवडायचा पाऊस आला की मग डॅडा व आर्वी खिडकीत बसून पावसाची गाणी गायचे. मम्माही मग मस्तपैकी थालीपीठ बनवून पावसाची मजा द्विगुणित करायची. पण आज डॅडा नव्हते. ऑफिसच्या कामानिमित्त बाहेर गेले होते. दुपार होती, मग मम्माही झोपली होती. आजी-आजोबा गावी गेले होते व आत्तू मैत्रिणीकडे गेली होती. घरात इतकी माणसं असूनसुद्धा आज मात्र पावसाबरोबर गंमत करायला कोणीही नव्हतं. छोटुकली आर्वी मस्तपैकी खिडकीवर बसून पावसाची गंमत बघत होती. बिल्डिंगच्या सातव्या मजल्यावरून खाली कसं सगळं मस्त दिसत होत. खाली काही मुले खेळत होती. काही काकू छत्री सांभाळत बाजारातून भाजी आणत होत्या. एखादं वाहन सूर्रर्र करून पाणी उडवत जात होतं.

'खाली जाऊया का?' आर्वीने विचार केला. 'पण मम्मा ओरडेल ना.. एक काम करूया अगदी थोडाच वेळ जाऊया. खाली त्या झाडावर किती मस्त फुलं फुलली आहेत. एक फूल घेऊया आणि येऊया की भर्रकन वर आणि आता तर पावसाचा जोरही कमी झालाय', आर्वीने विचार केला आणि पटकन चपला चढवून ती खाली आली. किती मस्त वाटत होतं... गार गार 'आता डॅडा असते ना तर त्यांच्याबरोबर खाली खूप मजा केली असती.' आर्वीला खूप छान वाटत होते. ती त्या फुलझाडाकडे आली, बागेमध्ये किती चिखल झाला होता. वरून बघताना खूप छान वाटत होतं पण खाली पावसाने केलेली नासधूसही दिसत होती. 'चला आता जाऊया वर'. आर्वीने विचार केला. 'अरे.. हा कसला आवाज येतोय', 'ची.. चीची...ची...' बागेच्या मागे जे झाड होते त्याच्यामागूनच येत होता हा आवाज. आर्वी झाडामागे गेली. 'अरे बापरे.. हे काय. एक छोटीशी खारुताई...' तिचा होता हा आवाज. बिचारीचा पाय कशात तरी अडकला होता. एका दोऱ्यात का कसल्या रिबिनीत.

बिचारी अगदी वेदनेने ओरडत होती. आणि तिच्याच बाजूला एक दुसरी खारुताई तिला सोडवण्याचा प्रयत्न करत होती. पण ती अडकली होती कशात? आर्वीने नीट पाहिलं आणि तिला आठवलं. काल रिषभचा वाढदिवस होता. सर्वांना बर्थडे पार्टीला बोलावलं होतं त्यानं, सर्वांनी खूप मजा केली होती. त्याच्या आईने मस्त रंगीबेरंगी रिबीनचं डेकोरेशन केलं होतं. खूप छान दिसत होतं. हं.. त्या डेकोरेशनची ही रिबीन होती जिच्यामध्ये ती बिचारी पिटुकली खारुताई अडकली होती. 'किती वाईट...' आर्वी स्वतःशीच म्हणाली. 'वस्तू वापरून झाल्या की कोणी असं कुठेही फेकून देते का? मम्मा नेहमी म्हणते की सर्व वस्तू जागच्या जागी ठेवाव्यात, नको असलेल्या वस्तू कचरापेटीत टाकाव्यात.'

'पण आता काय करावं. या पिटुकलीला कसं सोडवावं?' वॉचमनकाकाही जवळ दिसत नव्हते. 'कोणाला बोलावून आणावं का? पण तोपर्यंत या खेचाखेचीत या इटुकलीच्या पायाला काही झालं तर? थांब, मीच काही तरी करते.'

आर्वीने त्या खारुताईकडे बघितले. ती बिचारी अजूनच बावरली. आर्वी त्या खारुताईच्या जवळ गेली आणि खाली वाकून म्हणाली. ''ए छोटुली.. घाबरू नकोस हा, मी तुला मदतच करत आहे.. जरा शांत राहा..'' प्रेमाची भाषा सर्वांना समजते. ती खारुताई चक्क शांत झाली. मग आर्वी हळूच जवळ गेली आणि एका हाताने रिबीन पकडून दुसऱ्या हाताने त्या खारुताईचा इटुकल्या पाय हळूच हाती घेऊन त्या रिबिनीचे वेटोळे काढले. दोनच मिनिटांत त्या खारुताईचा पाय मोकळा केला. त्याबरोबर टुणकन् त्या खारुताईने खाली उडी मारली आणि ची..ची. करत आनंदाने त्या दोघी खारुताया पळाल्यासुद्धा, 'हुश्श्श... बरं झालं मी खाली आले ते.. नाही तर त्या बिचाऱ्या खारुताईचं आज काही खरं नव्हतं,' आर्वीला स्वतःलाच खूप मस्त वाटलं. 'कधी एकदा डॅडा येतायत आणि मी त्यांना हे सांगतेय असं झालं तिला. चला आता घरी जावं लागेल. खूपच वेळ झाला. मम्मा उठली तर ओरडेल. का एकटीच खाली गेले होतीस पावसात.. तेही न विचारता?' असं म्हणेल.

आर्वी घरी येतच होती आणि जोराचा पाऊस सुरू झाला. धावतच ती घरात शिरली. 'किती मस्त ना! जमाडी जंमत किती खूश झाली ती खारुताई.' आर्वी स्वतःशीच बोलली. 'चला.. मस्त पैकी हात पाय धुऊन घेऊया मम्मा उठण्याअगोदर.' आर्वी न्हाणीघरात गेली व मस्त हात पाय धुतले. न्हाणीघरात मोठ्ठा आरसा होता. आरशात तिने स्वतःला पाहिलं आणि.. 'हे काय.. डॅडाने वाढदिवसाला दिलेलं ते चकचकीत गुलाबी लॉकेट आणि चेन... दोन्ही गायब.. अरे बापरे.. आता थोड्या वेळापूर्वी तर गळ्यात होतं. खाली जाईपर्यंत होतं. नक्कीच होतं... म्हणजे खाली खारुताईला सोडवताना तिथे तर पडलं नसेल. आणि कोणी एव्हाना घेतलं असेल तर...' आर्वीला रडूच आलं. डॅडाने किती प्रेमानं दिल होतं ते.. आर्वीलही खूप खूप आवडलं होतं. सर्व मैत्रिणींसमोर किती मिरवले होते तिने. आणि आता.. आता ते हरवलं होतं. 'पटकन जाऊया का खाली.. शोधूया.. सापडेल नक्कीच.. पण पाऊस किती धो धो कोसळत होता. बागेमध्ये अजून जास्त चिखल झाला असेल..' आणि छत्री.. तीही नव्हती. भिजले तर मम्मा नक्कीच ओरडेल.. आर्वी रडवेली होऊन विचार करतच होती.. इतक्यात.. 'ची.. ची.. ची.. ची... अरे हा तर त्या खारुताईचाच आवाज वाटतोय..' पण तो खिडकीपाशी का येतोय? आर्वी विचार करू लागली. खिडकीत पाहते तर काय.. दोन्ही छोटुकल्या खारुताई खिडकीत हजर... 'अरे.. या इथे कशा... आणि हे काय..' आर्वीच्या आनंदाला उधाणच आलं जणू. एका खारुताईच्या हाती होती आर्वीची चेन आणि ते मस्त गुलाबी लॉकेट.. त्या खारुताई खास आर्वीला तिची हरवलेली वस्तू परत करायला आल्या होत्या. आर्वीला किती छान वाटले. आर्वीला आजीची गोष्ट आठवली. आजी म्हणाली होती... 'तुम्ही दुसऱ्यांना मदत केलीत ना की तुम्हांलाही मदत मिळतेच मिळतेच.'

आर्वीने ते लॉकेट घेतलं. 'धन्यवाद खारुताई' आर्वी म्हणाली. ची.. ची.. ची.. ची... असा आवाज आला. त्याही दोघी धन्यवाद म्हणत होत्या जणू 'थांबा हं दोन मिनिट' आर्वीला काही तरी आठवले. ती धावतच किचनमध्ये गेली. कालच मम्माने अक्रोड व गुळाच्या वड्या केल्या होत्या.. आर्वी दोन वड्या घेऊन बाहेर आली आणि खारुतायांसमोर त्या ठेवल्या. पटकन दोघींनी एक एक वडी उचलली व खाऊ लागल्या. आर्वीला ते पाहून खूपच मज्जा आली.

वड्या संपवून दोघींनी मस्त शेपट्या हलवल्या जणू त्या आर्वीला टाटा करत होत्या... आर्वीने मग त्यांना टाटा केलं व त्या दोघी छोटुकल्या सुरसुर करत पाईपवरून उतरून पळाल्या सुद्धा, आर्वी खूप खूश झाली. तिला आता दोन नवीन मैत्रिणी भेटल्या होत्या ना...!!

**संपर्क : ९९३०५५०२२२**

# कुतूहल

वसुंधरा भोपळे, ७३८७४३२९४१

‘किशोर’ मित्रांनो, ‘किशोर’ जून २०२५ च्या अंकातील कुतूहलची किती उत्तरे तुम्ही बरोबर दिलीत? या अंकात दिलेल्या उत्तरांशी आपण दिलेली उत्तरे ताडून पाहा. तुमच्यासाठी आणखी काही प्रश्न दिले आहेत. स्पर्धकांनी प्रश्नांची उत्तरे कोणाचीही मदत न घेता स्वतंत्रपणे लिहून पाठवण्याचे पथ्य काटेकोरपणे पाळावे. अचूक उत्तरे ‘किशोर’कडे २५ जुलै २०२५ पूर्वी अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावीत किंवा ई-मेल करावा.

**१. विद्यार्थ्यांना वैज्ञानिक संशोधनात सहभागी करून घेण्यासाठी कोणत्या मंत्रालयाने ‘वैज्ञानिक म्हणून एक दिवस’ हा उपक्रम सुरू केला आहे?**

१. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय
२. आयुष मंत्रालय
३. विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालय
४. संरक्षण मंत्रालय

**२. ‘गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार २०२५’ कोणाला जाहीर करण्यात आला आहे?**

१. सुरेश वाडकर
२. पं. भीमराव पांचाळे
३. अनुराधा पौडवाल
४. उषा मंगेशकर

**३. शिव छत्रपती क्रीडा जीवनगौरव पुरस्कार प्राप्त करणाऱ्या पहिल्या महिला शकुंतला खटावकर या --------- च्या रणरागिणी म्हणून ओळखल्या जातात.**

१. क्रिकेट २. हॉकी
३. कबड्डी ४. खो खो

**४. भारताने वाघाला ‘राष्ट्रीय प्राणी’ म्हणून केव्हा घोषित केले?**

१. ९ जुलै १९५२ २. ९ जुलै १९६९
३. ९ जुलै १९७२ ४. ९ जुलै १९८५

**५. महाराष्ट्रातील हरित क्रांतीचे प्रणेते ---------- यांची जयंती ‘महाराष्ट्र कृषी दिवस’ म्हणून साजरी केली जाते.**

१. यशवंतराव चव्हाण २. वसंतराव नाईक
३. नॉर्मन बोरलॉग ४. एम. एस. स्वामीनाथन

**६. खालीलपैकी कोणते वैज्ञानिक बालसाहित्य हे भारतीय खगोलशास्त्रज्ञ आणि लेखक जयंत नारळीकर यांनी लिहिले नाही ?**

१. अंतराळातील भस्मासूर २. यक्षांची देणगी
३. टाईम मशीनची किमया ४. प्लँटोन

**७. महाराष्ट्रात बळीराजा आणि त्याच्या बैलांसाठीच्या आत्मियतेचा ‘बेंदूर’ हा उत्सव कोणत्या मराठी महिन्यात साजरा केला जातो ?**

१. ज्येष्ठ २.वैशाख ३. आषाढ ४. श्रावण

**८. ‘अपोलो ११’ मोहिमेत खालीलपैकी कोण सहभागी नव्हते?**

१. नील आर्मस्ट्राँग २. एडविन बझ आल्ड्रिन
३. मायकेल कॉलिन्स ४. युरी गागरिन

**९. लोकमान्य टिळकांनी मंडालेच्या तुरुंगात असताना कोणत्या ग्रंथाची निर्मिती केली ?**

१. गीतारहस्य २. डोंगरीच्या तुरुंगातील १०१ दिवस
३. भारतीय स्वातंत्र्य समर ४. सार्वजनिक सत्यधर्म

**१०. सणांची रेलचेल असणाऱ्या श्रावण महिन्यात खालीलपैकी कोणता सण सर्वप्रथम येतो ?**

१. रक्षाबंधन २. गोकुळाष्टमी
३. नारळी पौर्णिमा ४. नागपंचमी

**११. महाराष्ट्रातील खालीलपैकी कोणत्या संतांच्या अभंगांचा समावेश शिखांचा धर्मग्रंथ ‘गुरुग्रंथ साहिब’ मध्ये असल्यामुळे ते शीख धर्मातही महत्त्वपूर्ण मानले जातात ?**

१. संत ज्ञानेश्वर २. संत नामदेव
३. संत चोखामेळा ४. संत गोरा कुंभार

१२. **जागतिक सहकार दिन : ४ जुलै, जागतिक लोकसंख्या दिन ?**
१. १५ जुलै     २. २२ जुलै
३. ११ जुलै     ४. १० जुलै

१३. **बीबीसीकडून क्रीडा क्षेत्रासाठी देण्यात येणारा २०२४ चा 'चेंज मेकर ऑफ द इयर' हा पुरस्कार मिळवणाऱ्या तानिया सचदेव या कोणत्या खेळाशी संबंधित आहे ?**
१. कुस्ती     २. टेबल टेनिस
३. बुद्धिबळ     ४. खोखो

१४. **भारताच्या पश्चिम घाटात व कोकणात कोणत्या प्रकारचा पाऊस पडतो ?**
१. प्रतिरोध २. आरोह ३.आवर्त ४. अनावर्त

१५. **ऑपरेशन सिंदूरच्या पत्रकार परिषदेत सहभागी झालेल्या दोन महिला अधिकारी कोण होत्या ?**
१. कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंह
२. कर्नल गीता मेहता आणि स्क्वॉड्रन लीडर अंजली शर्मा
३. कर्नल प्रिया शर्मा आणि विंग कमांडर नेहा राठी
४. कर्नल रश्मी राठी आणि विंग कमांडर अर्चना सिंह

## चित्रकोडे
रचना - घनश्याम देशमुख

## जून २०२५ च्या चित्रकोड्याचे उत्तर




## किशोर (मे २०२५) कुतूहल यशस्वी स्पर्धक

- **पालघर** – कु. आयुष गडग
- **परभणी**– कु. प्रचिती चांडक
- **सातारा** – कु. सुवीर फडे,
- **कोल्हापूर** – कु. अर्णव माणगावे

## किशोर (मे २०२५) चित्रकोडे यशस्वी स्पर्धक

- **सातारा** – कु. हर्षवर्धन सोडमीसे, कु. सुवीर फडे, कु. श्रीयांश सावंत, कु. अनुराधा आपटे
- **भंडारा** – कु. जय गोंधळे, कु. सायली चौधरी
- **सांगली** – कु. शांभवी कुलकर्णी
- **सोलापूर** – कु. प्रणिती झाडबुके, कु. वीरेंद्रसिंह मोहिते
- **अहिल्यानगर**– कु. तन्वी धस, कु. श्लोक आमले, कु. आरोही धस, कु. गौरी धस, कु. दर्शत नाथ, कु. सौरभ ढाकणे
- **पुणे** – कु. तन्वी भालेराव, कु. श्रुतेश पाटील
- **छ. संभाजीनगर**– कु. रिशान राजपूत
- **वर्धा** – कु. टिना मेंदुले
- **नांदेड** – कु. विराट गाढे, कु. गफार फासलाणी, कु. जैद शेख
- **कोल्हापूर** – कु. अर्णव माणगावे
- **नागपूर** – कु. अवनीश जोशी
- **अकोला** – कु. युक्ता देशमुख

## कुतूहल (जून २०२५) ची उत्तरे

| | | | |
|---|---|---|---|
| १ –३ | ६–४ | १०–२ | १४–१ |
| २–२ | ७–२ | ११–१ | १५–४ |
| ३–४ | ८–३ | १२–१ | |
| ५–२ | ९–१ | १३–४ | |

# भावी आधारस्तंभ

माणूस जेव्हा एखादी चांगली गोष्ट करतो, तेव्हा आपण त्याला चांगला म्हणतो. अशा चांगल्या गोष्टी तुम्हीही नक्कीच केल्या असतील.

- तुम्ही दुसऱ्यांबद्दल आपुलकी आणि सहानुभूती दाखवता का?
- जे तुमच्यापेक्षा लहान आणि दुर्बल आहेत त्यांचे रक्षण करता का?
- ज्यांना मदतीची गरज आहे त्यांना मदतीचा हात देऊ करणे म्हणजे चांगुलपणा, असे तुम्हांलाही वाटते ना?

मग लागा पाहू लिहायला. त्यासाठी सदर आहे - 'भावी आधारस्तंभ'. तुम्हांला मानधन व वर्षभर अंक मिळेल. तुम्ही केलेल्या सत्कृत्याचा १० ते १५ ओळी मजकूर सुवाच्य अक्षरांत लिहा. तुमचे संपूर्ण नाव, पत्ता (पिनकोड नंबरसह), शाळेचे नाव, वय, इयत्ता इत्यादी तपशील द्या. पासपोर्ट आकाराचा फोटोही लावा. पाकिटावर रु. ५/- चे तिकीट लावून अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवा.



आषाढी वारी सुरू झाली होती. माऊलींची पालखी आळंदीवरून सासवडला आली होती. जिकडे बघावे तिकडे दिंड्या आणि वारकरी दिसत होते. आमच्या खळद गावात पण वारकरी आले होते. असेच एक वारकरी आमच्या घराशेजारून चालले होते. धोतर, पांढरा शर्ट, डोक्यात पांढरी टोपी ,काखेत पिशवी, हातात भगवी पताका व गळ्यात तुळशीची माळ असा त्यांचा पोशाख होता. त्यांच्या मुखात सारखा 'माऊली माऊली' हा शब्द होता.

मी त्यांना पाहिले आणि म्हणाले, "या आजोबा,पाणी प्यायला." आजोबा हसत म्हणाले, "आलो,आलो बाई." मी आजोबांना पाणी दिले. ते पाणी पिऊन मला म्हणाले, "हुशार आहेस बाळा तू." मी म्हणाले, "तुमचं गाव कोणतं आहे?" ते म्हणाले, "बुलढाणा माझं गाव, खूप लांब आहे." मी म्हणाले, " तुम्हांला जेवायचंय का ?" ते म्हणाले, "नको,नको बाळा" पण त्यांना भूक लागली आहे असे मला वाटत होते. भुकेल्या लोकांना नेहमी जेवण द्यावे असे माझे पप्पा मला नेहमी म्हणतात म्हणून मी त्या आजोबांना म्हणाले, " मम्मीला तुमचा स्वयंपाक करायला सांगते." ते म्हणाले, "ठीक आहे."

घराजवळच आमचे शेत आहे. मम्मी शेतात होती. मी मम्मीला बोलावून घेतले. मम्मी आजोबांसाठी जेवण बनवू लागली. मग मी पुन्हा आजोबांसोबत गप्पा मारायला सुरुवात केली. "आजी कुठे आहे ?" "ती घरीच आहे, तिचे गुडघे दुखतात, त्यामुळे ती वारीला आली नाही." "तुम्हांला किती मुले आहेत?" "दोन मुले आहेत, पण काय कामाची नाहीत बघ." आजोबा पुन्हा सांगू लागले,

"माझा लाड मुलांना भोवला. ते जे जे मागायचे ते ते मी सगळे त्यांना देत राहिलो. पण त्यांनी माझा गैरफायदा घेतला. वाईट मित्रांसोबत राहून वाईट सवयी लावून घेतल्या आणि मला व आजीला त्रास देऊ लागले. त्यांना कंटाळून आम्ही आमचा गाव सोडून अनाथ आश्रमात येऊन राहायला लागलो."

आजोबांच्या बोलण्यावरून माझ्या लक्षात आले की, लहान वयात मुलांचा जास्त लाड करणे फायद्याचे नाही. यामुळे मुलांचे आयुष्य बिघडते आणि आईवडलांना देखील दुःख होते. आमच्या घरी जेवण करून आजोबा पंढरीच्या वाटेला निघाले. जाता जाता मला म्हणाले,

"बाळा, तू खूप हुशार आहेस, तुला पांडुरंग सुखी ठेवेल."


**कु. आर्वी विजय कादबाने**

इयत्ता- ३ री, जि. प. प्राथमिक शाळा खळद,

ता. पुरंदर, जि. पुणे- ४१२३०१



ही पावसाळ्यातील गोष्ट आहे. मी शाळेत जाण्यासाठी तयारी केली व घरून निघालो. रस्त्याने जात असताना रस्त्याच्या बाजूला एक मोबाईल पडलेला दिसला. मी तो उचलून दप्तरामध्ये ठेवला आणि घरी घेऊन आलो. मी माझ्या वडलांना मोबाईल बद्दल सांगितले. माझ्या बाबांनी मोबाईलवर आलेल्या मिस्डकॉलवर फोन लावून त्यांना मोबाईलबद्दल सांगितले. तो मोबाईल पंजाबमधील एका मुलाचा निघाला, तो मुलगा इथे कामाला आला होता. मोबाईल मिळाल्यामुळे त्याला आनंद झाला. ही गोष्ट मी माझ्या शिक्षकांना सांगितली. त्यांनी मला शाबासकी दिली.

**कु. हर्ष मनीष मालनकर**

इयत्ता ३ री, जि.प.प्राथ.शाळा,
दिवानझरी, मु. दिवानझरी, पो. हिवरखेड,
ता. तेल्हारा, जि. अकोला- ४४४१०३



पावसाळ्याचे दिवस होते. संध्याकाळी ५ वाजता माझे बाबा कामावर जाण्यासाठी तयार झाले. बाबांनी आईला चहा ठेवण्यास सांगितले तेव्हा आईच्या लक्षात आले की, चहा पावडर संपली आहे. बाहेर पाऊस पडत होता. मी छत्री घेऊन दुकानाकडे जात होते. जाताना रस्त्यात एका झाडाखाली मांजराचे एक छोटेसे पिल्लू कुडकुडत, म्याँव म्याँव ओरडत असताना दिसले. मला त्याची खूप दया आली. मी त्या पिलाला चटकन उचलून घरी आणले व त्याला कापडाने पुसून कोमट दूध प्यायला दिले. ते पिल्लू पोटभर दूध प्यायले आणि आमच्या बेडवर जाऊन खुशाल बसले. ते पाहून मी आनंदाने टाळ्या वाजवू लागले. माझ्या आईने, ताईने व बाबांनी माझे खूप कौतुक केले.

**कु. स्वरा रविकांत जगताप**

इ.४थी, कुमार विद्यामंदीर, गौरवाड,
ता. शिराळा, जि. कोल्हापूर- ४१६१०४



आमची वस्ती शाळा आहे. आमची वाडी वस्ती, चारही बाजूने डोंगराळ, खडकाळ वनविभागात आहे. गाव दूर आहे. जंगली प्राणी वारंवार दिसतात. कधी भंगारवाले, फेरीवाले, गारीवाले येतात. आमच्या वस्तीवर एकही कुत्रा राहत नाही. बिबट्या वारंवार कुत्रे मारून खातो. उन्हाळ्यात पाण्याची टंचाई होते. कोणीच कुणाला पिण्यासाठी सुद्धा पाणी द्यायला कुरकुर करतात. कारण पाणी दूरून आणावे लागते.

अशातच एक दिवस एक म्हातारी आजी रस्ता चुकून आमच्या वाडीत आली. तिला खूप घाम आला होता. चालूनचालून तिला तहान- भूक लागली होती. ती आमच्या ओट्यावर सावलीला बसली. घरी कुणीच नव्हते. आईवडील मजुरीने कामाला गेले होते. सुट्टीचा दिवस होता. आम्ही दोघे भावंडे घरीच खेळत होतो. ती आजी थकली होती. मी तिला पाणी दिलं. आमच्या दुपारचे जेवणातील जेवण तिला दिले. ती खूप आनंदाने जेवली. आम्हांला आशीर्वाद देऊन आल्या वाटेने परत गेली. मी आई बाबांना हे सांगितले. त्यांनी माझे कौतुक केले. मी शाळेत गेल्यावर सरांना सांगितले. त्यांनी परिपाठात कौतुक केले आणि गरजूंना मदत करा असा सल्ला दिला.

**कु. सानिका पांडुरंग काळे**

इयत्ता- ४ थी, जि .प. प्रा. शाळा, (मेनडोह), पळशी,
ता. पारनेर, जि. अहिल्यानगर- ४१४३०४.

उमलती प्रतिमा

# ऑपरेशन सिंदूर

जम्मू काश्मीर हा भारताचा स्वर्ग,
त्याचा आहे आम्हां सर्वांना गर्व.

२२ एप्रिल हा काळा दिवस काश्मीरचा,
दहशतवाद्यांनी जीव घेतला निष्पाप जीवांचा.

त्यांनी विचारला नाही देश, जात, वर्ग
विचारला फक्त आणि फक्त धर्म.

भारताने अडवले सिंधू नदीचे पाणी,
पाण्यासाठी व्याकूळ होतील पाकिस्तानी.

भारताने प्लॅन केला ऑपरेशन सिंदूर,
पाकिस्तानात उडाला आगीचा धूर.

ऑपरेशन सिंदूरमुळे भारताने केली दिवाळी,
पाकिस्तानाची झाली राख रांगोळी.

नऊ ठिकाणी दहशतवाद्यांचा खात्मा केला,
पाकिस्तानाला चांगलाच धडा शिकवला.

धडा शिकवून सुद्धा पाक नाही थांबला,
शेवटी त्यांनी ड्रोनमार्फत हल्ला केला.

भारतही आहे तयार उत्तर द्यायला,
त्यांचा हल्ला भारताने तोंडघशी पाडला.

सुट्टीवरील सैनिकांना कामावर बोलावले,
त्यांचे क्षणभर सुखही हिरावून घेतले.

भारत पाकिस्तान युद्ध सुरू झाले,
धर्मावरूनच का हे नाही कळाले.

माहीत नाही कधी होईल युद्धविराम,
पण पाकिस्तनाला कदापि देऊ नका आराम.

धर्माच्या नावाखाली दहशतवाद फोफावतोय,
त्याला प्रत्युत्तर द्यायला भारत सरसावतोय.

कु. संस्कृती नितीन पाटील (इ.६वी)
टेंबलाईवाडी विद्यालय, मनपा शाळा क्र.३३
कोल्हापूर- ४१६००५



कु. प्राची दीपक विशे
इयत्ता ४ थी, जि. प. शाळा सोनावळे,
ता. मुरबाड जि. ठाणे- ४२१४-२



कु. ईश्वरी जाधव
इयत्ता - ४ थी, जि.प.प्राथमिक शाळा, चाफळ, मु.पो.चाफळ, ता. पाटण, जि. सातारा- ४१५ ५२०.

## ।। चिमुकल्या पुस्तकावर चिमुकलीचा चिमुकला अभिप्राय ।।

तीर्थस्वरूप, आ. इंद्रजीत भालेराव सर,

साष्टांग दंडवत.

प्रिय सर, तुम्ही कसे आहात..? मी आमच्या सरांकडून तुमचे 'गाणे गोजिरवाणे' हे पुस्तक वाचण्यासाठी घेतले होते. पुस्तकाचे मुखपृष्ठ फारच छान आहे. त्याच्यावर एक लहान मुलगा व लहान मुलगी 'चाऊ म्याऊ' चा खेळ खेळत आहेत. मला यातील 'दिन दिन दिवाळी' गाणे खूप आवडले. ते पाठही झाले. आमचे सर दिवाळीला दिवटी करत होते. दिवटी लव्हाळ्याच्या गवतापासून तयार केली जाते. त्या दिवटीत दिवा ठेवायचा आणि गाई म्हशींना ओवाळायचं. सर, मला की नाही आधी दिवटी आणि ड्युटीच्या अर्थातला फरक समजला नव्हता. त्यानंतर मला दोन्हीचा अर्थ समजला. सर, तुम्ही दोन कडव्यांच्या कविता केल्या आहेत. पण त्या कविता फार छान आहेत. मला 'येरे येरे ढगा' गीत खूप आवडले. त्यातील शेवटचं कडवं खूप छान आहे .

***येरे येरे ढगा । खाली भराभरा***
***बापाच्या डोळ्याला । लागल्यात धारा***

खरंच सर, पाऊस नाही आला तर शेतकरी बापाला वाटतं की कधी पाऊस येईल ? बापाच्याने जर पेरणे झाले नाही आणि पाऊस आला तर बापाला असेही वाटतं की आज आपण पेरायला पाहिजे होतं.

मला आभाळातलं पाखरू ही कविता फार आवडली. ती खूप मजेदार आहे व त्या कवितेची मला सर्वच कडवी आवडली.

***फुटलं तर फुटलं । काचाचं***
***उद्या भरू । पाचाचं***

हे कडवं मात्र सर्वात जास्त आवडलं. सर, मी माझ्या आजीला 'पिंगा' गाणं वाचून दाखवले. माझ्या आजीला हे गाणं खूप आवडले. या गाण्यातील फक्त एक कडवं माझ्या आजीला येत नव्हतं, ते म्हणजे

***आड बाई आड गं । सुपारीचं झाड गं,***
***झाडाला आल्या शेंगा, घाल गं पोरी पिंगा***

हे कडवं आजीला माहीत नव्हतं. माझ्या आजीला 'पिंगा' हे गाणं ऐकून लहानपणीची आठवण झाली. माझी आजी 'चिंचे खाली डुलती' न म्हणता 'पळसाखाली डुलती' असे म्हणत होती. मला तुमच्या बऱ्याच कविता आवडल्या. या संग्रहात काही कोडी आहेत. ती कोडी फार छान आहेत. लहान लेकरांसाठीही काही कविता, गाणी आहेत. मला काही कविता पाठही झाल्या आहेत.

सर, तुमच्या सगळ्याच कविता मस्त आहेत. 'गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या' ही कविताही खूप आवडली. मला आधी 'शिंदोळ्या' म्हणजे काय ते नव्हतं. त्याविषयी सरांनी सांगितले. पुस्तकातील चित्रं खूप आवडली. खूप छान काढली आहेत. सर, तुमचे 'गाणे गोजिरवाणे' हे पुस्तक माझ्या चुलत भावाने, बहिणीनेही वाचले. माझ्या आजीने सुद्धा हे पुस्तक वाचले असते पण माझ्या आजीला वाचता येत नाही. 'चिकूल्या बाई चिकूल्या, दिन दिन दिवाळी, आपटी थापटी, आमची म्हैस, हातात घडी आणि फुगडी' अशी अनेक गाणी मला पाठ झाली आहेत. सर, मी तुमची पुस्तकं आमच्या सरांकडून वाचण्यासाठी घेणार आहे.

**पुस्तकाचे नाव** – गाणे गोजिरवाणे **पुस्तकाचे लेखक** – इंद्रजीत भालेराव,
**पुस्तकाचे चित्रकार** – सरदार जाधव **प्रकाशक** – आदित्य प्रकाशन

कु. प्रगती अंजना ज्ञानेश्वर गाडेकर
वर्ग – चौथा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रायपूर,
ता. सेलू जि. परभणी– ४३१५०३


जादूगाराची सुटका
घनश्याम देशमुख संपर्क : ९८२३४१३६२९
नीट ऐका. जादूगाराच्या कुटुंबाला या गुंडांनी घरात ओलीस ठेवले आहे आणि जादूगाराला हे लोक त्याच्याच गाडीतून बाहेर घेऊन जात आहे. कशासाठी ते माहीत नाही...
मी काय म्हणते, आपण पोलिसांना फोन करायचा का? ते गुंड पकडले जातील.
पोलिस येईपर्यंत हे सर्व जण येथून पसार होतील. तुम्ही दोघं इथं थांबा!
आम्ही इथं थांबून काय करू! आणि तू कुठे जात आहे?
मी या बंगल्याच्या मागे जाऊन बघतो. आत शिरायला काही जागा आहे का?
विनय बंगल्याच्या कंपाऊंडवर चढला



आणि भिंतीचा आधार घेत दुसऱ्या मजल्यावरच्या बाल्कनीतून आत शिरला.
ते दोघे खालच्या मजल्यावरच्या ड्रॉइंगरूम मध्ये आहेत.
मला जादूगार किंवा त्यांच्या पत्नीसोबत बोलता आलं तर...
पण त्या दोघांजवळ जर ते गुंड उभे असतील तर मग करायचं काय?
कुणीतरी जिना चढून वर येतंय..
साहेब! लवकर कपडे बदला. आपल्याकडे जास्त वेळ नाही..
अरे हो रे! शहरात मला सर्व जण ओळखतात. काहीतरी वेगळाच ड्रेस करावा लागेल
हे तर जादूगारच आहेत.
क्रमशः

# पावसात आपण नाचू या

प्रशांत वाघ

आनंदाने गाऊ या
पावसात आपण नाचू या

ढगांना आला होता राग
काळे ठिक्कर पडले फार
ढगांनी केली ढिशूम ढिशूम
वीजबाई गेली चमकून

रडू लागले ढग सारे
अश्रूंचे झाले ते झरे
झरे वाहती खळखळ
पाने वाजती सळसळ

झरे झाले पुढे ओढे
नाचू मस्तीत आपण थोडे
पुढे झाली गंमत फार
ओढ्यांनी केले डोंगर पार

ओढ्यांची पुढे झाली नदी
बेडकांनी मारली त्यामध्ये उडी
नदीची वाट नागमोडी
समुद्रात मारली तिने दडी

इंद्रधनूने केली कमान
त्यातून गेले छोटे विमान
होड्या सोडल्या पाण्यात
नाचू गाऊ या तालात...

संपर्क : ८८८८४९६६६३







Original Marathi Poem – Dr. Sangita Barve
English Translation – Pranjali Barve

# I Wish To Become...

*I wish to become*
*A leaf lush green*
*and In that colour*
*I would submerge myself in ...*

*I wish to become*
*A flower pinky red*
*and I will rest myself*
*On that green leafy bed...*

*I wish to become*
*A huge tall tree*
*Where everyone feels*
*Peaceful and free ...*

*I wish to become*
*Crystal clear water*
*and Climbing down the mountains*
*I will rejoice With my river*
*daughter ...*

*I wish to become*
*Dark grey cloud*
*and Watering with my hands*
*I will make the world*
*Green & proud...*

*Contact : 8412014752*

Atul Shirude

# Raya and the value of a drop

Raya was a bright, cheerful Seven-year-old boy who lived in a small city called Bori. His family included his loving parents and a playful younger sister. Raya studied in the 2nd standard at the nearby government school and always topped his class. His intelligence and curiosity made him the favorite student of all his teachers.

Proud of his achievements, Raya's parents provided him with everything he needed—and sometimes even gave in to his little whims and stubborn requests. He was a good child in every way—except for one habit.

Raya had a tendency to waste water.

He would leave the tap running while brushing his teeth, use too much water while bathing, and splash around for fun without a second thought. His parents often reminded him not to waste water, gently explaining that it was a precious resource.



"Raya," his father said one day, "every drop of water matters. People and animals depend on it to survive."

His mother echoed the same message: "There is only a limited amount of clean, drinkable water in the world. We must use it wisely, my son."

They tried to teach him through stories, examples, and kind words. But nothing seemed to work. Raya's habit continued, and his parents grew increasingly concerned.

Then came the school holidays after Raya's final exams. To celebrate, the family decided to visit their native village, located about 100 kilometers from Bori. Excited, they packed their bags and set off early the next morning in their family car.

As they drove through the countryside, Raya saw a line of women walking with pots on their heads to fetch water. A few kilometers later, they passed a hand pump where many women stood in a long queue, waiting for their turn. Further along, they came across a dried-up lake with dead fish scattered across its cracked surface.

Raya watched everything closely. His father made sure he noticed it all.

When they finally arrived at the village, Raya's grandparents welcomed them with warm hugs and smiles. After washing up and settling in, the family learned something surprising: in this village, water was supplied to homes only once every five days due to severe shortages.

Later that evening, as they sat under the stars, Raya's father gently brought up the topic again.

"Raya," he said, "remember the women walking miles just to collect a pot of water? Or the dead fish in the dried-up lake? That's what happens when water is wasted."

His grandfather added wisely, "Water is life, my child. We must respect it, cherish it, and never take it for granted."

Raya sat quietly, thinking deeply. The images from the journey, the words of his parents, and the situation in the village stirred something in his heart. For the first time, he truly understood.

That night, he made a quiet promise to himself and to his family he would never waste water again. From now on, he would use only as much as needed and encourage others to do the same.

His parents and grandparents beamed with pride and smile. Raya's small but powerful decision had brought great joy to his family.

And so, from that day onward, Raya became not just a brilliant student— but a young guardian of water, too.

**Contact : . 9665033908**

'किशोर' हे मासिक मालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक हेमंत बाबर यांनी मे. प्रिंटप्लस प्रा. लि., गाळा नंबर १ ते १०, ई-१, जय जलाराम इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, व्हिलेज पिंपलास, ता. भिवंडी, जि. ठाणे ४२१३११. येथे छापून 'बालभारती', सेनापती बापट रोड, पुणे ४११००४ येथे प्रसिद्ध केले. * संपादक - कृष्णकुमार पाटील.

**'Kishor' monthly publication is owned by Bureau of Text Book Production and Curriculum Research, Balbharati, Printed and Published by Hemant Babar, Printed at M/s. Printplus Private Limited., G-1 to G-10, E-1, Jai Jalaram Industrial Complex, Village Pimplas, Taluka Bhiwandi, Dist-Thane 421311. and Published at Balbharati, Senapati Bapat Road, Pune-411004. * Editor - Krishnakumar Patil**


# Funny Puzzle

Ghanshyam Deshmukh


**Spot and circle six differences between the two pictures.**








**Count and colour the different shapes.**



# चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

हे चित्रांचे शब्दकोडे आहे. यात चित्रांची नावे लपलेली आहेत. प्रत्येक चित्र बघून खालील चित्रकोडे पूर्ण करा.




## सूचना


१) स्पर्धकांनी आपले नाव केवळ पाकिटावर न लिहिता कोडे सोडवले असेल त्या कागदावर लिहिणे आवश्यक आहे.

२) कोड्याचे उत्तर पाठवण्याची अंतिम तारीख २५ जुलै २०२५.

३) कोड्याचे उत्तर ऑगस्ट २०२५ च्या अंकात प्रसिद्ध होईल.

४) कोडे वेगळ्या कागदावर सोडवले तरी चालेल.

Registered Postal.No. PCW/076/2024-2026 RNI NO. 22679/72
Date of publication 26.06.2025 Date of Posting 27th & 28th June 2025 posted at PUNE PSO, GPO- 411 001
(License to Post without prepayment of postage No. WPP-53/2024-2026)




**If not delivered please return to :**
संपादक, ‘किशोर’ मासिक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
बालभारती, सेनापती बापट मार्ग,
पुणे- ४११ ००४.
दूरध्वनी : ०२०- २५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in
वेबसाईट : www.kishor.ebalbharati.in

प्रति,